www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १६ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, रविवार १९ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात

### पुण्यात दिवसाढवळ्या दरोडा; पिस्तूल घेऊन दुकानात शिरले, टोळक्याने सराफा दुकान लुटले



● पुणे, अभिजीत येरल्लू:

पुण्यातील वानवडी येथील सराफा दुकानावर दिवसाढवळ्या दरोडा टाकण्यात आला आहे. शहरातील वानवडी येथील महंमदवाडी रस्त्यावरील बीजीएफ ज्वेलर्सवर पिस्तुलाचा धाक दाखवून 400 ग्रॅम सोने लुटण्यात आले आहे. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे दरोडे खोरांचा शोध सुरु केला आहे.

शिक्षणाचे माहेरघर अशी ओळख असलेल्या पुण्यात कोयता गँग तसेच चोरी, दरोड्याच्या घटना वाढल्या आहेत. नुकतेच पुणे लोकसभेच्या निवडणुका संपल्या आहेत. चार जून रोजी मतदान होणार आहे. पोलिस यंत्रणा मतदान झाल्यानंतर आता ईव्हीएम मशिनच्या रक्षणात तैनात आहेत. अशातच पुण्यात भर दिवसा बंदुकीचा धाक दाखवून सराफा दुकान लुटण्यात आले आहे.

पुण्यातील वानवडी पोलिस स्टेशनच्या हद्दीतील महंम्मदवाडी मार्गावर सात जणांच्या टोळक्याने बीजीएफ ज्वेलर्स येथे दरोडा टाकला. पिस्तूलाचा धाक दाखवून टोळक्याने 300 ते 400 ग्रॅम सोने लुटले. हा सर्व प्रकार ज्वेलर्स दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. सीसीटीव्हीच्या आधारे आता पोलिसांनी दरोडेखोरांचा शोध सुरु केला आहे. दिवसाढवळ्या पुणे शहरात अशा प्रकारे सशस्त्र दरोडा टाकला गेल्याने पोलिस यंत्रणेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

## निवडणूक साक्षरतेसाठी मुंबई विद्यापीठाची मोलाची कामगिरी

# ४०० हून अधिक महाविद्यालयांचा सहभाग

● मुंबई, यश सावंत :



सार्वत्रिक निवडणूक २०२४ या अनुषंगाने सर्व सामान्य जनता व विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता व्हावी याकरिता मुंबई विद्यापीठाने विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन करून लक्षणीय कामगिरी केली आहे. भारत निवडणूक आयोग आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार मुंबई विद्यापीठाने मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या सहकार्याने गेल्या सहा महिन्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून निवडणूक साक्षरता वाढीस लावण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने निवडणूक साक्षरता व जागृती मोहीमेच्या माध्यमातून निवडणूक साक्षरतेचे विविध कार्यक्रम राबवण्यात आले. या निवडणूक साक्षरता मोहिमेचे उद्घाटन गेल्या डिसेंबर महिन्यात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्यावेळी कुलगुरूंनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत आजमितीस मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक विस्तार उपक्रमांमध्ये सहभाग घेतलेल्या सुमारे चारशे महाविद्यालयांनी या मोहिमेत सहभाग घेतला आहे.

विद्यार्थ्यांची नोंद

मतदान या विषयावर पथनाट्य, भित्तीचित्र प्रदर्शन, प्रबोधन गीते, वक्तृत्व, पोवाडा, सर्वेक्षण, वक्तृत्व, परिसंवाद आणि परिषदा अशा विविध उपक्रमांद्वारे जनतेमध्ये निवडणूक साक्षरता वाढीस लागण्यास मुंबई विद्यापीठाने नियोजन पूर्वक कार्यक्रमांची आखणी करून बाजी मारली आहे.

पान २ वर

### शासनाच्या प्रयत्नांना हातभार

“भारताच्या इतर भागांप्रमाणेच मुंबईतही नागरिकांमध्ये निवडणूक साक्षरता वाढवण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न केले जात आहेत. सार्वत्रिक निवडणूक 2024 मध्ये नवीन मतदार नोंदणी करणे व मतदानात जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा या हेतूने निवडणूक साक्षरता अत्यंत महत्वाची बनली आहे. एकंदरीत शासकीय प्रणाली, मतदान प्रक्रिया, निवडणूक प्रक्रिया या बाबतची समज व ज्ञान जनतेला व्हावे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन विद्यापीठाने अत्यंत परिश्रमपूर्वक निवडणूक साक्षरता उपक्रम हाती घेऊन शासनाच्या प्रयत्नांना हातभार लावला आहे.

## कब्रस्थानसह इतर समस्या सोडविण्याचे श्रीकांत शिंदे यांचे आश्वासन




● उल्हासनगर, रोहित जैसवाल :

महायुतीचे श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारा निमित्त ओमी कलानी यांच्या ओमी टीमच्या वतीने रिजेन्सी येथे मुस्लिम मेळाव्याचे आयोजन शुक्रवारी रात्री केले होते. यावेळी शिंदे यांनी कब्रस्थानसह इतर समस्या सोडविण्याचे आश्वासन मुस्लिम समाजाला दिले आहे.

उल्हासनगरात कलानी कुटुंब महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांच्या पाठीमागे राहून प्रचार मोहीम राबविली. माजी आमदार पप्पु कलानी हे स्वतः प्रचारात उतरले होते. शुक्रवारी ओमी कलानी यांच्या ओमी टीमच्या वतीने रिजेन्सी हॉल येथे मुस्लिम मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला कलानी समर्थक पदाधिकार्यासह मुस्लिम समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्याला श्रीकांत शिंदे यांनी मार्गदर्शन करून कब्रस्थानसह इतर समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. पप्पु कलानी यांनीही मार्गदर्शन करून श्रीकांत शिंदे यांच्या पाठीमागे उभे राहण्याचे आवाहन केले. तसेच शनिवारी सकाळी शिंदेसेनेच्या युवासेनेने शहरातून मोटरसायकल रॅली काढण्यात आली.

## राजन विचारे यांना हितेंद्र ठाकूर यांचा बिनशर्त पाठिंबा



● ठाणे, नितीन देवळेकर :

वसई-विरार या भागात मोठे अस्तित्व असलेल्या हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने (बविआ) ठाणे लोकसभेसाठी इंडिया आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांना दर्शविला आहे. बिनशर्त पाठिंब्याचे पत्र बविआ पक्षाचे ठाणे जिल्हा सचिव मयुर तोरणे यांनी राजन विचारे यांना दिले आहे. बविआने २०१७ मध्ये ठाणे महापालिका निवडणूकीत त्यांच्या पक्षाचे उमेदवार उभे केले होते. अनेक ठिकाणी त्यांना मतदान झाले होते.

बविआ पक्षाचे बळ पालघर जिल्ह्यातील वसई-विरार, नालासोपारा पट्ट्यात अधिक आहे. मिरा भाईंदर, ठाणे जिल्ह्यातही या पक्षाचे कार्यकर्ते मोठ्याप्रमाणात आहेत. पालघर लोकसभा मतदारसंघात बविआ पक्षाने राजेश पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे पालघर मतदारसंघात तिरंगी लढत आहे. बविआ पक्षाचे ठाणे जिल्ह्यातील अनेक भागात कार्यकर्ते आणि पदाधिकारी आहेत. बविआ पक्षाचे ठाणे जिल्हा सचिव मयुर तोरणे यांनी पक्षाच्या वतीने पत्रक काढत इंडिया आघाडीचे ठाणे लोकसभेचे उमेदवार राजन विचारे यांना बिनशर्त पाठिंबा दर्शविला आहे.

पान २ वर

## लाखो वारकऱ्यांसाठी आनंदाची बातमी, 2 जूनपासून विठुरायाच्या चरणी नतमस्तक होता येणार

● पंढरपूर, विशाल पाटील

लाखो वारकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. येत्या 2 जूनपासून श्री विठ्ठलाचे चरणस्पर्श दर्शन सुरु होणार आहे. याबाबतची माहिती विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे प्रमुख गहिनीनाथ औसेकर गेल्या अनेक दिवसांपासून मंदिराच्या गाभाऱ्याचे काम सुरु होते. त्यामुळं विठ्ठलाचे चरणस्पर्श दर्शन बंद होते. आता पुन्हा पूर्ववत दर्शन सुरु होणार आहे.

गेल्या 15 मार्चपासून विठ्ठल रुक्मिणीचे चरण स्पर्श दर्शन बंद होते. कारण मंदिराच्या संवर्धनाचे काम सुरु आहे. हे काम पुढेही 17-18 महिने हे काम सुरु राहणार आहे. पण मंदिराच्या गर्भगृहाचे व चार खांबाचे काम अंतिम टप्प्यात आलं आहे. त्यामुळं येत्या 2 जूनपासून विठ्ठल मंदिर पूर्ववत पदस्पर्शाने सुरु करण्यात येणार असल्याची गहिनीनाथ औसेकर यांनी दिली आहे. 2 जूनपासून 9 जूनपर्यंत ज्या राहिलेल्या कुटी पुजा आहेत, त्या सर्व देवाच्या पुजा होणार आहेत. देवाची तुळशी आणि पाद्य पुजा पर्ववत सुरु होणार असल्याची माहिती औसेकर महाराजांनी



### 73 कोटीच्या आराखड्यातील कामे सध्या सुरु

■ विठ्ठल मंदिर विकासासाठी सुरु असलेल्या 73 कोटीच्या आराखड्यातील कामे सध्या सुरु आहेत. विठ्ठल मंदिराला पुरातन 700 वर्षापूर्वीचे रूप येऊ लागले आहे. सध्या विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या गर्भगृहातील ग्रॅनाईट फरशी, फ्लोरिंग काढून टाकायचे काम अंतिम टप्प्यात आलं आहे. त्यामुळं संपूर्ण मंदिराला पुरातन काळातील दगडी फ्लोरिंग बसवण्यात येत आहे. मंदिरातील नंतरच्या काळात बसवण्यात आलेले मार्बल, ग्रॅनाईट आणि याच पद्धतीच्या चकचकीत फारशा काढून टाकण्यात येत असल्याने खऱ्या अर्थाने मंदिरातील पुरातन असणारा दगड आता मोकळा श्वास घेऊ लागला आहे.

## शेतातल्या घरातच चालवायचा बनावट देशी दारुचा कारखाना; पोलिसांचा छापा, आरोपीचा निघाला काटा

● धुळे, सचिन कदम:

गडचिरोलीत दोन दिवसांपूर्वीच अवैध दारुचा साठा जप्त करण्यात आला होता. पोलिसांनी खबऱ्याच्या माहितीच्या आधारे सापळा रचून दोन वाहनांसह लाखो रुपयांची देशी-विदेशी दारु ताब्यात घेतली होती. आता, धुळे तालुक्यातील वार शिवारातील एका इसमाच्या शेतातील घरामध्ये बनावट देशी दारूचा कारखाना चालवण्यात येत होता. पश्चिम देवपूर पोलिसांनी शेतातीर घरात सुरू असलेला हा कारखाना उध्वस्त केला आहे. या कारवाईत 63 हजार 840 रूपये किंमतीच्या देशी दारूच्या बाटल्यांसह इतर साहित्य मिळुन एकूण 4 लाख 30 हजार 850 रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी, पोलिसांकडून दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.



सहाय्यक पोलिस अधीक्षक एस. ऋषीकेश रेड्डी यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पश्चिम देवपूर पोलीस ठाण्याचे पो.नि. सुरेश शिरसाठ यांनी पोउनि मनोज कचरे, पोहेकॉ कुणाल साळवे, पंडीत मोरे, पोकॉ सुनिल राठोड, सनी सरदार, अतुल जाधव, किरण भदाणे, चालक पोकॉ अमोल सोनवणे, वाल्मीक पाटील तसेच आझादनगर पोलीस ठाण्याचे पोकॉ गौतम सपकाळ यांना कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर, पोलीस पथकाने मंगळवारी रात्री एक वाजेच्या सुमारास धुळे तालुक्यातील वार शिवारात महेंद्र राजाराम चव्हाण याच्या शेतातील घरावर छापा टाकला. या छाप्यात 63 हजार 940 रूपये किंमतीच्या देशी दारूच्या बाटल्या व इतर साहित्य मिळुन एकूण 4 लाख 30 हजार 850 रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी वार शिवारातील शेतात धाड टाकली असता, पुठ्ठयाच्या बॉक्समध्ये देशी दारुच्या बाटल्या भरल्याचं दिसून आलं. तसेच, या बाटल्यांनी भरलेले बॉक्स एकावर एक असे रचण्यात आले होते. तर, बाजुलाच बांधण्यात आलेल्या खोल्यांमध्ये बनावट दारु बनवण्याचे साहित्यही आढळून आले आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तेथील सर्वच अवैध व बनावट मद्यसाठा जप्त केला असून संबंधितावर कारवाई करण्यात आली आहे.

## “भारतीय विद्यार्थ्यांनी घराबाहेर पडू नये”, किर्गिस्तानमधील हिंसाचाराच्या घटनेनंतर दुतावासाकडून सतर्कतेचा इशारा!




● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

किर्गिस्तानमधील बिश्केक येथे झालेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर भारत सरकारकडून चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर किर्गिस्तानमधील भारतीय विद्यार्थ्यांनी घराबाहेर पडू नये, अशी सुचना भारतीय दुतावासाकडून देण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांनी भारतीय दुतावासाच्या संपर्कात राहावे, असे विदेशमंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी भारतीय दुतावासाकडून संपर्क क्रमांकही जारी करण्यात आला आहे. किर्गिस्तानमध्ये सद्यस्थिती १५ हजार भारतीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

बिश्केक येथील हिंसाचाराच्या घटनेनंतर भारतीय दुतावासाने एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत भारतीय विद्यार्थ्यांना सतर्क राहण्याच्या सुचना केल्या आहेत.

पान २ वर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाला हात लावाल तर भाजपाचे नामोनिशान राहणार नाही: मल्लिकार्जून खर्गे




■ हा आत्मा नरेंद्र मोदींना सत्तेतून घालवल्याशिवाय शांत बसणार नाहीः शरद पवार
■ मुंबईतील सभा नरेंद्र मोदींची शेवटची सभा; ४ तारखेला संपूर्ण देश डिमोदीनेशन करणारः उद्धव ठाकरे
■ नरेंद्र मोदींचे हुकूमशाही सरकार उखडून टाकण्याचा जनतेचा संकल्पः नाना पटोले
■ बीकेसी मैदानावर इंडिया महाविकास आघाडीची परिवर्तन सभा संपन्न.

● मुंबई, विशाल कारंडे :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स यंत्रणांच्या माध्यमातून विरोधकांना जेलमध्ये टाकण्याचे काम केले. परंतु हिंदुस्थानची जनता रशिया, बांग्लादेश, पाकिस्तान सारखी परिस्थीती होऊ देणार नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान कोणत्याही परिस्थितीत अबाधित ठेवू. भाजपा, आरएसएस व नरेंद्र मोदींनी लाख प्रयत्न केले तरी ते संविधानाला हात लावू शकणार नाहीत, बदलू शकणार नाहीत आणि तसे प्रयत्न केले तर भाजपाचे नामोनिशान राहणार नाही, अशा इशारा काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी दिला.

बीकेसी मैदानावर इंडिया महाविकास आघाडीच्या परिवर्तन सभेत खर्गे बोलत होते, ते पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी नेहमी प्रश्न विचारतात की, ७० वर्षात काँग्रेसने काय केले? काँग्रेसने लोकशाही व संविधान वाचवले नसते तर नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान कधीच झाले नसते. मोदींची गॅरंटी खोटे बोलणे आहे. १५ लाख रुपये देणार, दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देणार, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करु असे म्हणाले पण मोदींनी यातील काहीही केले नाही. काँग्रेस आघाडीचे सरकार आले तर तुमच्या दोन एकर जमिनीतून तर एक एकर जमीन मुस्लीमांना देतील, दोन म्हशी असतील तर त्यातील एक म्हैस मुस्लीमांना देतील ही पंतप्रधानाची भाषा आहे का? ज्या दिवशी मुस्लीमांच्या विरोधात बोलेन त्या दिवशी सार्वजनिक जिवनातून निवृत्त होईन म्हणाले व दुसऱ्याच दिवशी हिंदू मुस्लीमावरच बोलले. नरेंद्र मोदी एससी, एसटी, मागास समाजाला काहीही देऊ इच्छित नाहीत. ३० लाख सरकारी पदे रिक्त आहेत पण मोदींनी जागा भरल्या नाहीत. महागाई, बेरोजगारीवर बोलत नाहीत. नरेंद्र मोदी पुन्हा सत्तेत येणार नाहीत तर इंडिया आघाडी ३०० जागा जिंकून सत्तेत येईल असा विश्वासही खर्गे यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यावेळी म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी विचाराने सोबत नसलेल्यांना जेलमध्ये टाकले आहे. विरोधी पक्षाच्या अनेक नेत्यांना मोदींनी जेलमध्ये टाकले. बाळासाहेब ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांना कठीणवेळी मदत केली त्याचा त्यांना विसर पडला आहे. यावेळची लढाई ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान वाचवण्याची आहे. भटकती आत्मा अशी टीका केलेल्या नरेंद्र मोदींना सडतोड उत्तर देत शरद पवार म्हणाले की, हा आत्मा तुम्हाला सत्तेतून घालवल्याशिवाय शांत बसणार नाही.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्र हा शाहु, फुले, आंबेडकरांचा आहे, तो मोदीशाह यांचा होऊ देणार नाही.

पान २ वर

# संपादकीय

## खुली चर्चा व्हावीच!

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत दोन्ही प्रमुख उमेदवारांची समोरासमोर चर्चा करण्याची प्रथा आहे. त्यातून लोकांना आपल्या भावी अध्यक्षांच्या भूमिका समजावून घेता येतात आणि देश यापुढे कोणत्या दिशेने जाणार आहे याचाही अंदाज बांधता येतो. भारतातही अशीच प्रथा सुरू करण्याची सूचना न्या. मदन लोकुर, दिल्ली हायकोर्टाचे माजी न्यायाधीश अजित शहा आणि ज्येष्ठ पत्रकार एन. राम यांनी केली होती. तसा प्रस्तावही त्यांनी नरेंद्र मोदी राहुल गांधी यांना दिला आहे. त्याला राहुल गांधी यांनी लेखी प्रतिसाद देत अशा खुल्या चर्चेची तयारी दर्शवली आहे, पण मोदींकडून त्याला अजूनही कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. वास्तविक मोदींनी तशी तयारी दर्शवायला काहीच हरकत नव्हती. पण त्यांच्या एकूणच कारकिर्दीतील वादग्रस्त विषय लक्षात घेता अशी जाहीर चर्चा त्यांच्याच अंगलट आली असती. त्यामुळे मोदींनी त्या प्रस्तावाला तयारी दर्शवली नाही, हे कोणाच्याही सहज लक्षात येईल.

वास्तविक, मोदींची कम्युनिकेशनची शैली राहुल गांधी यांच्यापेक्षा अधिक प्रभावशाली आहे. अमोघ वक्तृत्व हीसुद्धा मोदींची जमेची बाजू आहे. त्यामुळे राहुल गांधी यांच्याशी समोरासमोर चर्चा करताना त्यांना काहीही अडचण येण्याचे कारण नव्हते. पण या चर्चेचे निमंत्रण त्यांनी टाळल्याने एक बाब लोकांच्या अगदी ठळकपणे लक्षात आली आहे की, केवळ उत्तम संवाद शैली असून उपयोग नाही, तर सांगण्यासारखे कर्तृत्व आणि ठोस कामगिरीचीही त्याला जोड असावी लागते. मोदी नेमके तिथेच कमी पडत आहेत आणि लोकांपुढे ही कमजोर बाब लक्षात येऊ नये म्हणूनच त्यांनी हे निमंत्रण टाळले असावे ही वस्तुस्थिती आहे. मोदी व्यासपीठावरील भाषणात राहुल गांधींपेक्षा भारी आहेत हे खरे असले तरी राहुल गांधी यांच्याकडे मोदींना डिवचण्याचे किंवा त्यांना नामोहरम करण्याचे अनेक मुद्दे आहेत. मोदींना पंतप्रधान होऊन आता जवळपास दहा वर्षे होत आली आहेत. या दहा वर्षांत त्यांनी एकही पत्रकार परिषद घेतलेली नाही हाही मुद्दा खटकणारा आहे.

पंतप्रधानपदावर राहिलेल्या नेत्याने लोकांच्या प्रश्नांना थेटपणे सामोरे गेले पाहिजे, नियमितपणे पत्रकार परिषदा घेतल्या पाहिजेत, पण मोदींनी हे सगळे टाळून केवळ रेडिओवरून 'मन की बात' ऐकवण्याचा मार्ग स्वीकारला आहे. अगदी निवडणुका जवळ आल्या की ते आपल्या मर्जीतील काही जणांना टीव्हीवर मुलाखती देतात. पण हा सारा मामला केवळ एक बनाव असतो. अशा सक्रप्टेड मुलाखतीचे मुलाखतकार मोदींना क्रॉस करण्याच्या भानगडीत पडत नाहीत. किंबहुना क्रॉस करणार्या पत्रकारांच्या ते वाटेलाच जात नाहीत. याही लोकसभा निवडणुकीच्या काळात त्यांच्या अशा स्वरूपाच्या तीन- चार मुलाखती प्रकाशित झाल्या आहेत. त्यातील प्रश्न मोदींना आधीच दिले गेले होते हे त्यांच्या उत्तरावरूनही लगेच लक्षात येते. रिपब्लिक टीव्हीच्या अर्णव गोस्वामी यांनाही त्यांनी अगदी लेटेस्ट मुलाखत दिलेली दिसली. पण अर्णव गोस्वामी नावाचा पत्रकार गेली अनेक वर्षे त्याच्या टीव्ही चॅनेलवर भाजपचीच लाइन चालवतो आहे. केवळ भाजपचीच लाइन चालवणे हा प्रकारही एकवेळ समजू शकतो; पण काँग्रेसवर आणि अन्य विरोधकांवर तो स्वतःचे वैयक्तिक दुश्मन असल्यासारखे तुटून पडतो. हार्डकोअर हिंदुत्वाची लाइन त्यांनी सातत्याने लावून धरली आहे. त्यामुळेच गोस्वामीसारख्या पत्रकारांना त्यांनी दिलेल्या मुलाखतींचा फारसा प्रभाव पडलेला नाही. या पार्श्वभूमीवर खरे मोदी लोकांना समजून घ्यायचे असतील तर त्यांनी अशा समोरासमोरच्या चर्चेला होकार दिला असता तर त्याचे स्वागतच झाले असते. निदान पक्षी एक खुली पत्रकार परिषद घेऊन त्यांनी त्यांच्या सरकारवर केल्या जाणार्या टीकेला उत्तरे देऊन आपली बाजू मांडायला हवी होती.

आता निवडणुकीचे महत्त्वाचे चार टप्पे पार पडले आहेत. केवळ तीन टप्पेच बाकी आहेत. त्यामुळे आपली ही खुली चर्चा अंगलट आली तरी त्याचा मतदान प्रक्रियेवर काहीही परिणाम होणार नाही हे लक्षात घेऊन मोदींनी अशा चर्चेला अजूनही तयारी दाखवावी अशी सगळ्यांचीच अपेक्षा आहे. मोदींच्या कारकिर्दीबद्दल अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. लोकांना त्या प्रश्नांवर त्यांच्याकडूनच उत्तरे अपेक्षित आहेत. यातील दोन ठळक मुद्दे म्हणजे मणिपूर हिंसाचार प्रकरण आणि ब्रिजभूषण शरणसिंह यांच्यावर देशाच्या पदक विजेत्या महिला कुस्तीपटूंनी लावलेले आरोप. या महिला कुस्तीपटूंनी आपल्याला न्याय मिळत नाही म्हणून आपली पदके गंगेत फेकून देण्यापर्यंत उद्विग्नता व्यक्त केली होती. लोकांमध्येही या प्रकरणाविषयी कमालीची चीड निर्माण झाली असतानाही मोदींनी ब्रिजभूषणची पाठराखण केली. त्यांची पाठराखण करण्याने आपल्याला राजकीयदृष्ट्याही तोटा होऊ शकतो याचाही विचार मोदींनी केला नाही. इतकी टोकाची पाठराखण करण्याविषयी मोदींच्या तोंडूनच लोकांना उत्तरे हवी आहेत. मणिपुरात गेले सुमारे वर्षभर हिंसाचार सुरू असतानाही ते या विषयावर ना संसदेत बोलले, ना ते मणिपुरात लोकांना शांत करण्यासाठी गेले. यावरही मोदींना बोलते झालेले लोकांना ऐकायचे होते. बाकी देशाच्या विकासात मोदींचे नेमके योगदान किती वगैरे मुद्दे एकवेळ नजरेआड केले जाऊ शकतात. निवडणुकीत दिलेल्या एकाही आश्वासनाची मोदींकडून पुर्तता झालेली नाही.



### आजची चित्रोळी

आवडीने रुप धरताती फुलें
उघडून डोळे बघताती !
निरागस रुप मोहविते मना
मोद जीवनात भरताती !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाला...

भाजपाने ४०० पारचा नारा दिला, आपण अब की बार भाजपा तडीपार चा नारा दिला आणि मग भाजपा गप्प झाले, त्यानंतर त्यांनी घराणेशाहीचा मुद्दा काढला. घाटकोपरमध्ये होर्डिंग कोसळून लोक मृत्यूमुखी पडले त्याच रस्त्यावरून नरेंद्र मोदींनी वाजत गाजत रोड शो केला.शिवसेनेने भाजपाला कठीण काळात मदत केली त्या शिवसेनेला नकली म्हणता. १० वर्षात मोदींनी काय केले, प्रचारात ते सारखे हिंदू मुस्लीम, हिंदू मुस्लीम करत आहेत. कधी घुसखोर म्हणता, देशद्रोही ठरवता. देशाचे स्वातंत्र अबाधित ठेवण्यासाठी इंडिया आघाडी एकत्र आली आहे. ज्या प्रमाणे मोदींनी नोटबंदी जाहीर करुन त्या रात्रीपासून ५०० व १००० रुपयांच्या नोटांचे संपवल्या तसेच नरेंद्र मोदी हे शेवटचे मुंबईत आले आहेत, ४ तारखेला संपूर्ण देश डिमोदीनेशन केल्याशिवाय गप्प बसणार नाही, असे उद्धव ठाकरेंनी ठणकावून सांगितले.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल म्हणाले की, पंतप्रधान देशाला हुकूमशाही कडे घेऊन जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान दिले ते हळूहळू संपवण्याचे काम भाजपा करत आहेत. दिल्लीत आम आदमी पक्षाचा नरेंद्र मोदी सामना करु शकत नाहीत, हरवू शकत नाही म्हणून खोटी तक्रार करुन जेलमध्ये टाकले. गरीब मुलांना चांगले शिक्षण व आरोग्याची सुविधा उपलब्ध केली हेच मोदींना नको आहे त्यासाठीच मला अटक करण्यात आली. २ तारखेला पुन्हा जेलमध्ये जावे लागणार आहे पण इंडिया आघाडीचे सरकार आले तर मात्र जेलमध्ये जावे लागणार आहे. रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी सर्व विरोधकांना एक तर जेलमध्ये टाकले किंवा त्यांना संपवले. नरेंद्र मोदी भारतातील विरोधकांना जेलमध्ये टाकत आहेत. बांग्लादेशातही तेच चालले आहे. पाकिस्तानतही तेच चालले आहे, मोदी सुद्धा भारताला पाकिस्तान, बांग्लादेश बनवू पहात आहेत. मोदी सरकार पुन्हा आले तर ठाकरे, शरद पवार प्रियंका गांधी सर्व विरोधी नेत्यांना जेलमध्ये टाकले जाईल, अशी भिती केजरीवाल यांनी व्यक्त केली.

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की,मोदींना पर्याय कोण, हा प्रश्न विचारला जातो पण काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर पदयात्रा काढली व त्यानंतर मणिपूरमधून पदयात्रा काढली व १० हजार किलोमीटरच्या या पदयात्रेने देशातील वातावरण बदलून टाकले. निवडणूक प्रचार सुरु झाल्यापासून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महाराष्ट्रात सभावर सभा घेतल्या. मोदींनी १० वर्षात काय केले हे सांगत नाहीत, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत पण मोदींनी शेतकऱ्यांबद्दल एक शब्द काढला नाही. राज्यातील उद्योग गुजरातला नेऊन तरुणांना बेरोजगार केले. नरेंद्र मोदींना खुर्चीची चिंता आहे.

जनतेने ही निवडणूक हातात घेतली आहे, ४ जूनला मोदी सरकार जाणार आहे कारण नरेंद्र मोदींचे हुकूमशाही सरकार उखडून टाकण्याचा संकल्प जनतेनेच केला आहे.

या सभेला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, मुंबई काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड, राज्यसभा खासदार चंद्रकांत हंडोरे, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, AICC चे सचिव आशिष दुआ, बी. एम. संदीप, उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, शिवसेना खासदार संजय राऊत, तुषार गांधी आदी उपस्थित होते.

### 2 जूनपासून विठुरायाच्या चरणी नतमस्तक...

पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली काम सुरु

विठ्ठल मंदिरातील सोळखांबी, चौखांबी आणि गाभारा तसेच रुक्मिणी मातेचा गाभारा येथे पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरु आहे. या भागात असणारे दगडी खांब पुरातत्व विभाग शास्त्रोक्त पद्धतीने साफ करीत असल्याने या नक्षीदार खांब, छत आणि फ्लोरिंग याचे मूळ दगडी आकर्षक वैभव दिसू लागलं आहे. विठ्ठल मंदिरातील दगडांवर अत्यंत सुंदर नक्षीकाम आता अतिशय आकर्षकरीतीने समोर येऊ लागले असून मंदिरातील जुने दगडी फ्लोरिंग बाहेर येताच शेकडो वर्षांपूर्वी लोकांनी त्यावर लिहिलेला मजकूर दिसू लागला आहे. दरम्यान, आता हे काम अंतिम टप्प्यात असून, येत्या 2 जूनपासून विठ्ठलाचे चरणस्पर्श दर्शन घेता येणार आहे.

### "भारतीय विद्यार्थ्यांनी घराबाहेर पडू नये",...

"बिश्केकमधील परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे. आम्ही तेथील भारतीय विद्यार्थ्यांच्या संपर्कात आहोत. तिथे तणावपूर्ण शांतता असली तरी भारतीय विद्यार्थ्यांनी घराबाहेर पडू नये, अशी सुचना आम्ही त्यांना दिली आहे, असे भारतीय दुतावासाने म्हटलं आहे. तसेच त्यांनी मदतीसाठी संपर्क क्रमांकही जारी केला आहे. विद्यार्थ्यांना काही मदत हवी असल्यासे त्यांनी ०५५५७१००४१ या क्रमांकावर संपर्क करावा", असे ते म्हणाले.

विदेशमंत्री एस. जयशंकर म्हणाले...

याबरोबरच विदेशमंत्री एस. जयशंकर यांनी भारतीय विद्यार्थ्यांना दुतावासाच्या संपर्कात राहण्याची सुचना केली आहे. "बिश्केकमधील परिस्थितीवर आम्ही लक्ष्य ठेऊन आहोत. तेथील परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे. मी भारतीय विद्यार्थ्यांनी विनंती करतो की त्यांनी भारतीय दुतावासाच्या संपर्कात रहावे", असे ते म्हणाले.

१३ मे रोजी किर्गिस्तानची राजधानी बिश्केकमधील एका वसतिगृहात विदेशी आणि स्थानिक विद्यार्थ्यांमध्ये मारहाणीची घटना घडली होती. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होते परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. तसेच पोलिसांनी काही स्थानिक विद्यार्थ्यांना अटकही केली. मात्र, खऱ्या गुन्हेगारांवर कारवाई होत नसल्याचे म्हणत इतर विद्यार्थ्यांनी पाकिस्तानी विद्यार्थ्यांच्या खोलीत जाऊन तोडफोड केली होती. तसेच काही विद्यार्थिनींशी गैरवर्तनही केले.

### राजन विचारे यांना हितेंद्र ठाकूर यांचा..

राजन विचारे यांचे ठाणे लोकसभा मतदारसंघात मोठे सामाजिक कार्य आहे. त्यामुळे तिसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून देण्यासाठी त्यांना पाठिंबा देत असल्याचे पत्रकात म्हटले आहे. ठाणे महापालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणूकीत बविआ पक्षाने त्यांचे उमेदवार उभे केले होते. त्यावेळी नगरसेवक म्हणून उमेदवार निवडून आले नव्हते. परंतु त्यांना इंदिरानगर, वागळे इस्टेट भागातून मतदान झाले होते.

### निवडणूक साक्षरतेसाठी मुंबई विद्यापीठाची...

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता वाढवण्यासाठी विविध विद्या शाखेतील विद्यार्थ्यांसाठी मतदार शिक्षण व निवडणूक साक्षरतेचा अभ्यासक्रम तयार करून आवश्यक ते श्रेयांक देण्याची तरतूद मुंबई विद्यापीठाने केली आहे. निवडणूक साक्षरतेच्या अनुषंगाने अध्यापन करण्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे.

युनिफाईड डिस्ट्रिक इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशन (USISE), ऑल इंडिया सर्वे फॉर हायर एज्युकेशन (AISHE) आणि अन्य डेटाबेस सहाय्याने महाविद्यालयातील सतरा वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नोंद घेऊन 1 जानेवारी, 1 एप्रिल, व 1 ऑक्टोबर या दिवशी आणि मतदार याद्यांच्या वार्षिक अवलोकनावेळी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाइन मतदार नोंदणी करण्याच्या अनुषंगाने संस्थात्मक कार्यप्रणाली तयार करण्यात आली होती. त्याचबरोबर मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची नोंद नव्याने मतदार म्हणून करण्यास शासनाच्या सहकार्याने विशेष मोहीम विद्यापीठामार्फत राबवण्यात आली होती

## घरगुती बचतीची घसरण

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ताज्या आकडेवारीनुसार घरगुती बचतीची आकडेवारी 47 वर्षांमधील नीचांकी स्थितीवर आहे. यावर प्रकाश टाकणारा हा लेख.

अनेक दशकांपासून भारत हे बचत करणार्यांचे राष्ट्र आहे. भारतीय कुटुंबांचं वैशिष्ट्य आहे की, काहीही झालं तरी, कमाईतील एक मोठा भाग, भविष्यातील गरजांसाठी बाजूला काढणे. भारताच्या एकूण सकल देशांतर्गत बचतीमध्ये 70 टक्के हिस्सा हा कौटुंबिक बचतीचा आहे. कौटुंबिक बचतीची ही सवय फार कमी देशात आढळून येते. परंतु, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ताज्या आकडेवारीनुसार घरगुती बचतीची आकडेवारी 47 वर्षांमधील नीचांकी स्थितीवर आहे.

घरगुती बचत पारंपरिक बँक ठेवीमधून, बिगर बँक ठेवींसह, भांडवली बाजाराकडे सरकताना दिसते. वर्ष 2023 या आर्थिक वर्षामध्ये बचतीचं प्रमाण घटून जीडीपीच्या 5.3 टक्के एवढं झाले, जे 2022 मध्ये 7.3 टक्के होतं. जास्त बचत करा व कमी खर्च करा, या जुन्या मंत्रापासून दूर जाण्याचे संकेत मिळत आहेत. सन 2001 मध्ये पारंपरिक बँक ठेवींचा वाटा एकूण आर्थिक बचतीपैकी 39 टक्के, तर भांडवली बाजाराचा हिस्सा 4 टक्के होता, जो सन 2023 मध्ये अनुक्रमे 37 टक्के आणि 8 टक्के आहे.

भारतात आर्थिक साक्षरता वाढल्याने जीवन विमा, भविष्य निर्वाह निधी आणि पेन्शन निधीकडे निर्देशित केलेली बचत सन 2001 मध्ये एकूण 34 टक्के होती, ती सन 2024 मध्ये वाढून 40 टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. याच काळामध्ये घरगुती कर्जाच्या प्रमाणात मोठी वाढ झाल्याचेही पाहायला मिळाले. कुटुंबे त्यांच्या उपभोगाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कर्ज घेत आहेत. वार्षिक कर्जाचे प्रमाण जीडीपीच्या 5.8 टक्के एवढं राहिलं. सन 1970 नंतरचं हे दुसरं उच्चांकी प्रमाण ठरलं. अर्थशास्त्रज्ञांनी भारतातील लोकांचं कर्जावर वाढणारं अवलंबित्व याबाबत चिंता व्यक्त केली आहे. जी 20 देशांमध्ये भारताचे दरडोई उत्पन्न सर्वांत कमी आहे. सरकार पायाभूत सुविधा आणि अनुदानासाठी कर्ज घेतो व जनता उपभोगासाठी कर्ज घेते.

आर्थिक बचतीचे आधीच कमी होणारे प्रमाण आणि कर्ज वाढत जाणे या निश्चितपणे गंभीर बाबी आहेत. कर्जाचे वाढते प्रमाण जसजसं कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कर्जावरचं अवलंबित्व वाढत जातं, त्यावेळी त्यांच्या बचतीतून खर्च होऊन ती कमी होऊ लागते. जेवढं अधिक कर्ज घेतलं तेवढा उत्पन्नाचा भाग ते कर्जाच्या परतफेडीसाठी वापरू लागतात, त्यामुळे बचत कमी होत जाते. जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत कमी बचत आणि अधिक कर्जाचा हा ट्रेंड काय सांगतो? कमी झालेले उत्पन्न महागाई आणि आर्थिक तणाव या आव्हानांबाबत यातून आपाणास इशारा मिळतो का ?

एकीकडे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आकडेवारीनुसार कमी झालेली घरगुती बचत व उच्च दायित्वाबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे, तर दुसरीकडे वित्त मंत्रालयाने असे म्हटले आहे की करोनाच्या साथीच्या रोगानंतर कमी व्याजदराचा फायदा घेऊन भारतीयांनी घरे आणि वाहने यासारख्या भौतिक मालमत्तांच्या निर्मितीवर अधिक खर्च करण्यास सुरुवात केली. त्यामुळे भारतीय कुटुंबांमधील आर्थिक दायित्वामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे घरगुती बचत ही भौतिक व आर्थिक बचतीची एकूण बेरीज करून बघितली पाहिजे..

घरगुती बचत कमी होण्याची प्रामुख्याने दोन कारणे आहेत. एक म्हणजे अलीकडच्या काळात नियमित लागणार्या वस्तूंच्या किमतीत वेगाने वाढ झालेली दिसते. त्यामुळे खिशातून अधिक पैसे जातात व बचत करणे कठीण होते. दुसरे कारण जीवनमान टिकवून ठेवण्यासाठी, कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड.

मग ही बचत वाढविण्यासाठी काय करणे अपेक्षित आहे ? घरगुती बचत वाढविण्यासाठी कुटुंबाने खर्च कमी करणे, उत्पन्न वाढवणे व स्मार्ट आर्थिक निर्णय घेणे अपेक्षित आहे. गुंतवणुकीचे पर्याय समजून घेऊन, कर बचत धोरणे अभ्यासून व आर्थिक नियोजन करून घरगुती बचत वाढवता येऊ शकते. त्याचबरोबर, सरकार करसवलती, शिक्षण, सेवानिवृत्ती कार्यक्रम आणि नियोक्त्यांना प्रोत्साहने याद्वारे बचतीची संस्कृती निर्माण करण्यास मदत करू शकते, ज्यामुळे उत्पन्नाच्या चक्रीय प्रवाहाला आकार मिळू शकतो. बचत करून लोक व्यवसायात गुंतवणूक करून आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून अर्थव्यवस्थेच्या वाढीस हातभार लावू शकतात.

## सुर्यनारायण कोपला.... काळजी घ्या......

राज्यात हवामान बदलाचा टप्पा सुरू झाला आहे. अवकाळी पाऊस ओसरला असून सुर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरवात केली आहे. राज्यात सर्वत्र उकाडा जाणवत असून राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाचर पोहचले आहे. मागील आठवड्यापासून संपूर्ण राज्यात प्रचंड उकाडा जाणवत आहे. विदर्भ मराठवाड्यासह संपूर्ण राज्य उकाड्याने हैराण झाले आहे. दरम्यान हवामान खात्याने महाराष्ट्रासह ( कोकणचा काही भाग ) अकरा राज्यात पुढील तीन दिवस ( २० मे ) उष्णतेची लाट राहील असा अंदाज वर्तवला आहे. महाराष्ट्रासह बिहार, राजस्थान, गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, ईशान्य भागातील काही राज्यात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. या लाटेमुळे तापमानाचा पारा ४५ ते ४६ अंशापर्यंत पोहचेल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. महाराष्ट्रातही विदर्भ, मराठवाड्यातील तापमान ४५ अंशाच्या पुढे जाऊ शकते असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार उष्णतेची ही लाट २० तरखेनंतरही कायम राहू शकते त्यामुळे उष्णतेची तीव्रता वाढणार असून नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागणार आहे. या महिन्या अखेर राज्यातील तापमान उच्चांकी पातळीवर पोहचेल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यावर्षी उन्हाळा अतिशय कडक असेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरताना दिसत आहे. मे महिना तर जिकरीचा ठरत आहे.



उन्हाने उच्चांक गाठला आहे. उन्हाने उच्चांक गाठला असल्याने उष्माघाताचा त्रास होऊन काही नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. मागील वर्षी खारघर मध्ये घडलेली दुर्देवी घटना अजूनही ताजी आहे. राज्यातील तापमान वाढला असल्याने घराबाहेर न पडण्याचा सल्ला तज्ज्ञ देत आहेत असे असले तरी आवश्यक कामासाठी, लग्न, देवधर्म कार्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. ग्रामीण भागात कुलदैवतांच्या यात्रा सुरू झाल्या आहेत. कंदुरीचे कार्यक्रम ठिकठिकाणी सुरू आहेत. महाराष्ट्रात यात्रा महत्वाचा भाग आहे. शाळांना सुट्ट्या लागल्या आहेत. सण समारंभ साजरा करण्यासाठी, ग्राम देवतांचे दर्शन घेण्यासाठी, लग्न कार्यासाठी, नातेवाईकांची भेट घेण्यासाठी लोकांची धावपळ सुरू आहे. त्यामुळे उन्हाळ्यापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागत आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्यांचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात.

उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब, मधुमेह सारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघाताने प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळेवर उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची देखील शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी लोकांनी घराबाहेर पडणे टाळावेच. दुपारी १२ ते ४ यावेळेत घराबाहेर पडूच नये. काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, चपला, बूट यांचा वापर करावा. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. तापमान वाढले की शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे डिहायड्रेशन होते. डिहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते त्यामुळे चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते उन्हाळ्यात हेच प्रमाण चार ते पाच लिटर इतके असते त्यामुळे घराच्या बाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्याबरोबरच नारळाचे पाणी, फळांचे व भाज्यांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही. उन्हाळ्यात आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात त्यामुळेच उन्हाळ्यात प्रत्येकाने आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. योग्य ती खबरदारी घेऊन आपण उन्हाच्या तिव्रतेपासून बचाव करू शकतो.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात



### 25 ठाणे लोकसभा मतदारसंघातील मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक, विभागाची यंत्रणा सज्ज - निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये-धुळे

● ठाणे - ठाणे जिल्ह्यात येत्या 20 मे 2024 रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदानासाठी 25- ठाणे लोकसभा मतदारसंघाची मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी आपला मतदानाचा अधिकार बजावून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन 25 ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये-धुळे यांनी केले. 25- ठाणे लोकसभा मतदारसंघातील एकूण 6 विधानसभा मतदारसंघात 2453 मतदान केंद्रे आहेत.

### ठाणे जिल्ह्यात १ लाख ५६ हजार ९३९ विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप होणार

● ठाणे : समग्र शिक्षा अभियानातंर्गत ठाणे जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या १ लाख ५६ हजार ९३९ विद्यार्थ्यांना १ लाख ६८ हजार ९५४ मोफत एकात्मिक पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने पुस्तकांची मागणी राज्य सरकारकडे केली आहे. येत्या शैक्षणिक वर्षाला १५ जूनपासून सुरुवात होत असून, शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्याचे नियोजन शिक्षण विभागाकडून करण्यात येत आहे. समग्र शिक्षा अभियानातंर्गत जिल्हा परिषद, नगरपालिका, खासगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येते.

यानुसार जिल्ह्यातील १ लाख ५६ हजार ९३९ विद्यार्थ्यांना पुस्तके मिळावीत, अशी मागणी ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने राज्य सरकारच्या बालभारती विभागाकडे केली आहे. मागणी केलेली पुस्तके बालभारती पनवेल गोडाऊन मधून तालुकास्तरावरील गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे देण्यात येतील.

तेथून केंद्रप्रमुख तसेच मुख्याध्यापकांकडे पुस्तके पोहचविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना सर्व पुस्तके शाळेच्या पहिल्याच दिवशी देण्यात येणार आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक छायादेवी शिसोदे व शिक्षण अधिकारी बाळासाहेब राक्षे यांच्या मार्गदर्शनाखाली पाठ्यपुस्तकांचे नियोजन करण्यात येत आहे. जिल्ह्यात पहिले ते पाचवीपर्यंत ९५ हजार ८२९ विद्यार्थ्यांसाठी १ लाख ९७१ पुस्तके तर सहावी ते आठवीपर्यंतच्या ६१ हजार २१० विद्यार्थ्यांसाठी ६७ हजार ९८३ पाठ्यपुस्तकांची मागणी करण्यात आली असल्याचे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने माहिती दिली आहे.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत जिल्हा परिषद नगरपालिका खाजगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येते त्यानुसार विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचा लाभ मिळेल.

# क्यूआरकोड प्रणालीच्या माध्यमातून मतदारांना मिळणार मतदानकेंद्राची माहिती - जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे

● ठाणे - येत्या 20 मे 2024 रोजी नागरिकांना मतदानासाठी मतदान केंद्रावर जाणे सोईचे व्हावे किंबहुना आपले मतदान केंद्र कुठे आहे याची माहिती क्यूआर कोडच्या माध्यमातून मिळणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या संकल्पनेतून जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे आणि जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे यांच्या माध्यमातून Election Atlas for Thane District For General Parliamentary Elections -2024 ही बारकोड प्रणाली तयार करण्यात आली आहे.

मतदानाच्या दिवशी मतदाराला मतदान केंद्रावर पोहचणे सहज शक्य व्हावे यासाठी Election Atlas for Thane District For General Parliamentary Elections -2024 ही बारकोड प्रणाली तयार करण्यात आले आहे. यामध्ये 23 भिवंडी, 24 कल्याण, 25 ठाणे या तीन लोकसभा मतदारसंघासाठी स्वतंत्र क्यू आर कोड तयार करण्यात आले आहे. मतदार जर ठाण्यातील असेल तर त्यांनी ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी असलेला क्यू आर कोड स्कॅन केल्यास त्यावर ठाण्यातील सर्व मतदान केंद्र दिसतील. त्यानंतर मतदारांनी




मतदार स्लीपवरील मतदान केंद्र क्रमांक क्लिक केल्यास मतदान केंद्र कुठे आहे,किती अंतरावर आहे, तसेच मतदान केंद्राकडे कसे जायचे याचा गुगल मॅप उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांना सहजरित्या पोहचता येणार आहे.

Election Atlas for Thane District For General Parliamentary Elections -2024 ही बारकोड प्रणाली जिल्हा समन्वय अधिकारी (संचार आराखडा) श्री.सुनील महाले, श्री. महेंद्रकुमार मेटकरी - परिवहन अभियंता, सिडको, श्री अबू अमीर,उपविभाग अभियंता तसेच सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी (संचार आराखडा) अनिकेत खांडेकर, सहाय्यक अभियंता, सिडको,श्री. अभिषेक चव्हाण, सहाय्यक परिवहन अभियंता, सिडको, श्री.राहुल कापडणीस, सहाय्यक परिवहन अभियंता, सिडको यांनी तयार केली आहे.

मतदाराला मतदान केंद्रापर्यंत जाणे सहज सोपे व्हावे व सदरचे क्यू आरकोड हे मतदारांपर्यंत पोहचावे यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर, फेसबुक पेजवर, तसेच व्हॉटसअॅपच्या माध्यमातून याची व्यापक प्रमाणात प्रसिद्धी करण्यात येत आहे. तसेच भिवंडी, कल्याण, ठाणे या मतदारसंघातील नागरिकांपर्यंत विविध माध्यमातून सदर क्यू आर कोडची माहिती उपलब्ध केली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी नमूद केले.

## 142 -कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या स्वीप पथकामार्फत ढोल पथकाबरोबरही मतदार जनजागृती

●ठाणे- ठाणे जिल्ह्यात 24 कल्याण लोकसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा प्रशासन, महापालिका प्रशासन, निवडणूक यंत्रणा अविरत प्रयत्न करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज 142 कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या स्वीप टीमने कल्याण पूर्व येथील बासुरीवाला ढोलपथकाच्या सदस्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देऊन मतदान करण्याचे आवाहन केले.



24 कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या स्विप पथकाच्या वतीने विविध माध्यमातून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. सोशल मीडिया, प्रिंट मीडिया यासह वेगवेगळे उपक्रमाद्वारे सातत्याने मतदान जनजागृती करून मतदान जनजागृतीचा हा जागर जनमानसाच्या मनामनात बिंबविला जात आहे.

142- कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघातील स्वीप पथकही अनेकविध उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदार जनजागृती करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज 142 कल्याण पूर्व विधानसभामतदारसंघाच्या स्वीप टीमने कल्याण पूर्व येथील बासुरीवाला ढोलपथकाच्या कलाकारासमोर मतदान जनजागृतीचे सादरीकरण केले. यावेळी तेथे उपस्थित ढोल पथकातील सादरकर्ते ढोलवादक/ विद्यार्थी- प्रामुख्याने नवमतदार, त्यांचे प्रशिक्षक यांनाही यावेळी मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात आले.

## साकडबाव येथे वीज पडल्याने ३ जण जखमी

● शहापूर : शहापूर तालुक्यातील साकडबाव परिसरातील गिऱ्याची वाडी येथे १६ मे रोजी येथे वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसात शरद कान्हू गिरा यांच्या घराच्याजवळ असलेल्या झाडावर वीज कोसळल्याने घरातील तीन जण जखमी झाले आहेत. सुदैवाने कुठल्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही. गेले चार दिवसांपासून सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पावसाची रोज सायंकाळी हजेरी लागत असल्याने आदिवासी बहुल भागातील परिसरात अनेक घरांचे पत्रे, छप्पर, कौले आणि अनेक घरांचे नुकसान झाले आहे. गुरुवारी १६ मे रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने शरद गिरा यांच्या घराशेजारी वीज कोसळल्याने घरातील शरद कान्हू गिरा, मिलिंद गिरा आणि त्यांची आई लक्ष्मी गिरा यांना या विजेचा प्रचंड धक्का बसल्याने तिघेही जखमी झाले असून त्यांना उपचाराकरिता शहापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर वादळी वाऱ्यासह येणाऱ्या अवकाळी पावसात तालुक्यात विविध ठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याची मागणी तात्काळ करण्यात येत आहे.

## रविवारी मध्य रेल्वेवर मेगाब्लॉक




● मुंबई - उपनगरी रेल्वे मार्गावरील रुळांची दुरुस्ती तसेच सिग्नल यंत्रणेत काही तांत्रिक कामे करण्यासाठी रविवारी १९ मे २०२४ रोजी रेल्वेच्या मध्य रेल्वेवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या माटुंगा -मुलुंड अप आणि डाउन जलद मार्गावर, तर हार्बर मार्गावरील कुर्ला - वाशी अप आणि डाउन मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.पश्चिम रेल्वेवर रविवारी कोणताही मेगाब्लॉक नसणार आहे.

मध्य रेल्वे -कुठे - माटुंगा- मुलुंड अप आणि डाउन जलद मार्गावर

कधी- सकाळी ११ .१० ते दुपारी ४.१० वाजेपर्यंत

परिणाम - या ब्लॉकदरम्यान सीएसएमटी येथून सुटणाऱ्या जलद मार्गावरील सेवा माटुंगा आणि मुलुंड स्थानकांदरम्यान दरम्यान डाउन धीम्या मार्गावर वळवण्यात येतील. ठाण्याच्या पुढे या जलद गाड्या डाउन जलद मार्गावर वळवण्यात येतील. ठाणे येथून सुटणाऱ्या अप जलद मार्गावरील सेवा मुलुंड आणि माटुंगा दरम्यान अप धीम्या मार्गावर वळवण्यात येऊन त्यांच्या संबंधित नियोजित थांब्यांवर थांबतील. त्यानंतर अप जलद मार्गावर पुन्हा वळवण्यात येतील. या सेवा गंतव्यस्थानी नियोजित वेळेच्या १५ मिनिटे उशीराने पोहोचेल.

हार्बर रेल्वे - कुठे - पनवेल- वाशी अप आणि डाउन हार्बर मार्गावर

कधी - सकाळी ११. १० ते दुपारी ४.१० वाजेपर्यंत

परिणाम - ब्लॉक कालावधीत वाशी/ बेलापूर पनवेल येथून सीएसएमटीकडे जाणाऱ्या अप हार्बर मार्गावरील सेवा आणि सीएसएमटी येथून वाशी/ पनवेल/बेलापूरकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा रद्द राहतील. ब्लॉक कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते वाशी आणि वाशी ते पनवेलदरम्यान विशेष लोकल चालविण्यात येतील. तसेच हार्बर मार्गावरील प्रवाशांना ब्लॉककालावधीतल ठाणे-वाशी/नेरुळ स्थानकांदरम्यान प्रवास करण्याची परवानगी आहे.

## 25 ठाणे लोकसभा मतदारसंघात एकूण 2061 अंध मतदारांना ब्रेल लिपीतील मतदार चिठ्ठ्यांचे वाटप

● ठाणे – लोकसभा निवडणुकीत सर्वच घटकातील नागरिकांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी 25 ठाणे लोकसभा मतदारसंघ अंतर्गत असलेल्या अंध मतदारांना ब्रेल लिपीतील मतदार माहिती चिठ्ठीचे वाटप प्रत्यक्ष अंध मतदारांच्या निवासस्थानी जावून करण्यात आले. 25 ठाणे लोकसभा मतदारसंघातंर्गत येत असलेल्या सहा विधानसभा मतदारसंघात एकूण 2061 अंध मतदारांना ब्रेल लिपीतील मतदार चिठ्ठीचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती 25 ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये-धुळे यांनी दिली.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता जास्तीत जास्त मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी सर्वतोपरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.या अंतर्गत ठाणे शहरातील जास्तीत जास्त अंध मतदारांना त्यांचा हक्क बजावण्यात सुलभता व्हावी, यासाठी ब्रेल लिपीमध्ये माहिती दस्तऐवज तसेच चिठ्ठी अंध मतदारांना देण्यात आली. ठाणे लोकसभा मतदारसंघात अंध मतदारांसाठी ब्रेल लिपीतील मतदार चिठ्ठ्यांची संख्या 2 हजार 306 इतकी होती, त्यापैकी एकूण 2 हजार 061 चिठ्ठ्यांचे वाटप घरोघरी जावून करण्यात आले.

145 मीरा भाईंदर मतदारसंघ – (मतदार चिठ्ठ्यांची एकूण संख्या – 283, वाटप करण्यात आलेल्या मतदार चिठ्ठ्यांची संख्या -257 टक्केवारी 91 %)

146 ओवळा माजिवडा मतदार संघ - (मतदार चिठ्ठ्यांची एकूण संख्या – 548, वाटप



करण्यात आलेल्या मतदार चिठ्ठ्यांची संख्या -498 टक्केवारी 91 %)

147 कोपरी पाचपाखाडी मतदार संघ - (मतदार चिठ्ठ्यांची एकूण संख्या – 366, वाटप करण्यात आलेल्या मतदार चिठ्ठ्यांची संख्या -307 टक्केवारी 85 %)

148 ठाणे मतदारसंघ - (मतदार चिठ्ठ्यांची एकूण संख्या – 203, वाटप करण्यात आलेल्या मतदार चिठ्ठ्यांची संख्या -170 टक्केवारी 83 %)

150 ऐरोली मतदार संघ (मतदार चिठ्ठ्यांची एकूण संख्या – 451, वाटप करण्यात आलेल्या मतदार चिठ्ठ्यांची संख्या -424 टक्केवारी 94 %)

151 बेलापूर मतदार संघ (मतदार चिठ्ठ्यांची एकूण संख्या – 455, वाटप करण्यात आलेल्या मतदार चिठ्ठ्यांची संख्या -405 टक्केवारी 89 %)

अंध मतदारांना मतदान केंद्रावर मतदान करता यावे यासाठी सोयीसुविधा करण्यात आल्या आहेत. सुलभ मतदानासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती यावेळी मतदारांना देण्यात आली. लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी आपली सर्व कामे बाजूला ठेवून उज्वल भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी आणि सर्वांनी न चुकता दिनांक २० मे २०२४ रोजी अवश्य मतदान करावे असे आवाहन अंध मतदारांना करण्यात आले.

अंध मतदारांच्या सोयीसाठी ब्रेल लिपीमधील मतदार माहिती चिठ्ठी मतदारांना प्रत्यक्ष घरी उपलब्ध करुन दिल्याबद्दल सर्व अंध मतदारांनी भारतीय निवडणूक प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# ठाणे जिल्ह्यातील 6604 मतदान केंद्रात होणार मतदान प्रक्रिया; 3325 मतदान केंद्राचे होणार वेबकास्टिंग

● ठाणे - ठाणे जिल्ह्यातील 23 भिवंडी, 24 कल्याण व 25 ठाणे या लोकसभा मतदारसंघात एकूण सुमारे 66 लाख 78 हजार 476 मतदारांना येत्या 20 मे 2024 रोजी मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. मतदानासाठी जिल्ह्यात तीनही लोकसभा मतदारसंघ मिळून एकूण 6604 मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. यामध्ये 36 मतदान केंद्रे ही सोसायट्यांच्या क्लब हाऊसमध्ये असणार आहेत.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानासाठी ठाणे जिल्ह्यात संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील तीनही लोकसभा मतदारसंघात मतदानासाठी विविध सुविधा निर्माण करण्यात आली आहे. जिल्ह्यात सर्व विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. सुलभ निवडणूक संकल्पनेनुसार ही सर्व मतदान केंद्रे तळमजल्यावर आणण्यात आली आहेत. या मतदान केंद्रांमध्ये मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह, उन्ह लागू नये म्हणून सावलीची व्यवस्था, रॅम्प, व्हिलचेअर आदी सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

सर्वाधिक मतदान केंद्रे मुरबाडमध्ये तर सर्वात कमी उल्हासनगरमध्ये

ठाणे जिल्ह्यात एकूण 6604 मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. भिवंडी लोकसभा मतदारसंघात एकूण 2191 केंद्रे आहेत. यात 134 - भिवंडी ग्रामीण (अ.ज) - 345 मतदान केंद्रे, 135 - शहापूर (अ.ज.) – 326 मतदान केंद्रे, 136 - भिवंडी पश्चिम - 297 मतदान केंद्रे, 137 - भिवंडी पूर्व - 314 मतदान केंद्रे, 138 - कल्याण पश्चिम - 398 मतदान केंद्रे, 139- मुरबाड - 511 मतदान केंद्रांचा समावेश आहे.

24 कल्याण लोकसभा मतदारसंघात एकूण 1960 मतदान केंद्रे असून यामध्ये 140 - अंबरनाथ (अ.जा.) - 319 मतदान केंद्रे, 141 – उल्हानगर- 251 मतदान केंद्रे, 142 - कल्याण पूर्व - 321 मतदान केंद्रे, 143 - डोंबिवली - 269 मतदान केंद्रे, 144 - कल्याण पश्चिम - 406 मतदान केंद्रे, 149- मुंब्रा कळवा - 394 मतदान केंद्रे एवढी संख्या आहे.

25 ठाणे लोकसभा मतदारसंघात एकूण 2453 मतदार केंद्रांची संख्या आहे. यामध्ये 145 - मिरा भाईंदर - 451 मतदान केंद्रे, 146 - ओवळ माजिवाडा - 466 मतदान केंद्रे, 147- कोपरी पाचपाखाडी - 366 मतदान केंद्रे, 148- ठाणे - 361 मतदान केंद्रे, 150- ऐरोली - 429 मतदान केंद्रे, 151- बेलापूर - 380 मतदान केंद्रांचा समावेश आहे.

मुरबाड विधानसभा मतदारसंघात जिल्ह्यामधील सर्वाधिक 511 मतदान केंद्रे आहेत. तर सर्वात कमी मतदार केंद्रे उल्हासनगर विधानसभा मतदार संघात 251 मतदार केंद्रे आहेत.

मॉडेल मतदान केंद्रे

यामध्ये जिल्ह्यात एकूण 18 मतदान केंद्रे ही महिलांद्वारे चालविण्यात येणार आहेत. तसेच 18 मतदान केंद्रे ही दिव्यांग आणि 18 मतदान केंद्रे ही युवकांद्वारे चालविण्यात येणार आहेत.


3325 मतदान केंद्राचे होणार वेबकास्टिंग

जिल्ह्यातील एकूण 6604 मतदान केंद्रांपैकी 3325 मतदान केंद्रावर वेबकास्टिंगची सुविधा देण्यात येणार आहे. यामध्ये भिवंडी लोकसभा मतदारसंघातील 1107 मतदान केंद्रे, कल्याण लोकसभा मतदारसंघातील 991 केंद्रे व ठाणे लोकसभा मतदारसंघातील 1249 मतदान केंद्रांचा समावेश आहे.

## अभिनेत्री सारा अली खान लवकरच अडकणार लग्नबंधनात!

बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खान बॉलिवूडच्या लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. अभिनेत्रीच्या लग्नासंदर्भात अनेक चर्चा होत असतात. सध्या सारा अली खानच्या लग्नाच्या चर्चा जोरदार सुरू आहेत. सारा अली खान यावर्षात लग्न करू शकते, असा दावा सोशल मीडियावर करण्यात येत आहे. अभिनेत्रीच्या लग्नासंदर्भात एक पोस्ट सोशल मीडियावर (Social Media) व्हायरल होत आहे. सारा अली खानचा साखरपुडा झाल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे आता अभिनेत्रीच्या लग्नाची आणि मिस्ट्री मॅन कोण हे जाणून घेण्याची चाहत्यांना उत्सुकता आहे.

सारा अली खानचं नाव बॉलिवूडच्या अनेक अभिनेत्यांसोबत जोडलं गेलं आहे. सुशांत सिंह राजपूत, कार्तिक आर्यन ते क्रिकेटर शुबमन गिल पर्यंत तिचं नाव जोडलं गेलं आहे. अभिनेत्रीने अद्याप पब्लिकली आपल्या रिलेशबाबत भाष्य केलेलं नाही. अशातच आता रेडिटव एक पोस्ट व्हायरल होत आहे. यात सारा अली खान लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याचा दावा करण्यात येत आहे.



सारा अली खानचा एका श्रीमंत उद्योगपतीसोबत साखरपुडा झाल्याचं समोर आलं आहे. रेडिटवर व्हायरल होणाऱ्या पोस्टनुसार, सारा अली खान तिच्या आगामी 'मेट्रो इन दिनों' (Metro in Dino) या चित्रपटाच्या शूटिंगनंतर लग्नाच्या तयारीला सुरुवात करणार आहे. पोस्टमध्ये म्हटलं आहे,'मी याआधीही सांगितलं आहे. त्यावेळी माझ्यावर कोणी विश्वास ठेवला नाही. पण साराचा साखरपुडा पार पडला आहे आणि दोन वर्षांच्या आत ती लग्नबंधनात अडकणार आहे.



## 'कान फिल्म फेस्टिव्हल २०२४'मध्ये सिद्धार्थ जाधवच्या 'या' मराठी चित्रपटाचं स्क्रीनिंग

मराठी रंगभूमी व सिनेसृष्टीत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणारा आणि सध्याचा आघाडीचा अभिनेता म्हणजे सिद्धार्थ जाधव. सिद्धार्थने आपल्या जबरदस्त अभिनयाने, विनोदी शैलीने मराठी रसिक प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. सिद्धार्थने आपल्या अभिनयाची छाप हिंदी सिनेसृष्टीतही उमटवली आहे. अशा हा हरहुन्नरी अभिनेत्याचा एक चित्रपट 'कान फिल्म फेस्टिव्हल २०२४'मध्ये दाखवण्यात आला. ही अत्यंत अभिमानस्पद बाब आहे. यासंदर्भात सिद्धार्थने स्वतः सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून माहिती दिली आहे.

#आपलामराठीसिनेमा 'कान फिल्म फेस्टिव्हल'बद्दल खूप वेळा ऐकलं होतं. जेव्हा जेव्हा इथे आपला 'मराठी सिनेमा' गेलाय तेव्हा तेव्हा अभिमान वाटायचा. 'कान फिल्म फेस्टिव्हल २०२४'मध्ये 'हजार वेळा शोले पाहिलेला माणूस' या चित्रपटाचे स्क्रीनिंग होत आहे आणि मी त्या सिनेमाचा भाग आहे. खूप आनंद झाला आहे." पुढे सिद्धार्थ लिहिलं, "'कान फिल्म फेस्टिव्हल'मध्ये जिथे जगभरातून गौरविलेले सिनेमे

बहुचर्चित असा 'कान फिल्म फेस्टिव्हल २०२४' सध्या जोरदार सुरू आहे. १४ मेपासून सुरू झालेला 'कान फिल्म फेस्टिव्हल' २५ मेपर्यंत असणार आहे. या फेस्टिव्हलला अनेक दिग्गज कलाकार मंडळी पाहायला मिळत आहेत. काल, बॉलीवूडची सौंदर्यवती, अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चन कानच्या रेड कार्पेटवर अवतरली. तिच्या ग्लॅमरस लूकने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. सध्या तिचे कानमधील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होतं आहे. कालच 'कान फिल्म फेस्टिव्हल'मध्ये सिद्धार्थ जाधवचा 'हजार वेळा शोल पाहिलेला माणूस' चित्रपट दाखवण्यात आला. तसंच १९ मेला देखील दाखवण्यात येणार आहे. यासंदर्भात पोस्ट करत सिद्धार्थने लिहिलं,"

येतात आणि बघितले जातात…तिथे आपल्या 'मराठी सिनेमाचं स्क्रीनिंग होत आहे याचा मला खूप आनंद आहे…धन्यवाद 'हजार वेळा शोले पाहिलेला माणूस' चित्रपटाची टीम. खूप छान वाटतंय. असंच प्रेम ठेवा. हा सिनेमा लवकरात लवकर तुमच्यासमोर सादर व्हावा याची मी आतुरतेने वाट पाहतोय…लव्ह यू…थँक्यू…" सिद्धार्थच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. अभिनेत्यावर कौतुकाचा व शुभेच्छांचा वर्षाव केला होतं आहे. दरम्यान, 'कान फिल्म फेस्टिव्हल'साठी अभिनेत्री छाया कदम काही दिवसांपूर्वी मुंबईतून रवाना झाल्या. त्यांचा विमानतळावरील फोटो सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला आहे.

## प्रभाससोबत नाही तर 'या' व्यक्तीसोबत विवाह बंधनात अडकणार अनुष्का शेट्टी? साखरपुडाही झाला...



'बाहुबली' चित्रपटातील देवसेनाम म्हणजे अभिनेत्री अनुष्का शेट्टी आता विवाहबंधनात अडकणार असल्याची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. अनुष्का शेट्टी आणि प्रभास (Prabhas) यांच्या प्रेमप्रकरणाची चर्चा होती. मात्र, प्रभास आणि अनुष्का यांच्या चाहत्यांना धक्का लागणार आहे. अनुष्का ही प्रभाससोबत विवाहबंधनात अडकणार नाही. अनुष्काने ही चित्रपट निर्मात्यासोबत विवाहबंधनात अडकणार आहे. या दोघांचाही साखरपुडा झाला असल्याचे वृत्त आहे. अनुष्का शेट्टी प्रभासला डेट करत असल्याची चर्चा त्यांच्या चाहत्यांमध्ये होते. अनुष्का आणि प्रभास हे दोघेही खूप चांगले मित्र आहेत आणि त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. 'बाहुबली' मालिकेत प्रभास आणि अनुष्काची जोडी प्रेक्षकांना खूप आवडली होती. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर कमाईचे विक्रम मोडले होते. त्यानंतर त्यांच्या डेटिंगच्या चर्चा सुरू झाल्या. इतकंच नव्हे तर त्यांच्या लग्नाच्याही चर्चा सुरू झाल्यात.

## दिनविशेष

**घटना**

२०१८ : प्रिन्स हॅरी आणि मेघन मार्कल यांचे लग्न सेंट जॉर्ज चॅपल, विंडसर येथे झाले.

२०००: स्पेस शटल प्रोग्राम - अमेरिकेने स्पेस शटल अटलांटिस यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला पुन्हा सामान पुरवण्यासाठी STS-101 मिशनवर प्रक्षेपित केले.

१९९६: स्पेस शटल प्रोग्राम अमेरिकेने स्पेस शटल एंडेव्हर यान मिशन STS-77 साठी प्रक्षेपित केले.

१९७१: मार्स प्रोब प्रोग्राम - सोव्हिएत युनियनने मार्स २ अंतराळयानाचे प्रक्षेपण केले…

१९६३ : मार्टिन लूथर किंग जूनियर यांचे बर्मिंगहॅम जेलमधील पत्र द न्यू यॉर्क पोस्ट संडे मॅगझीनने प्रकाशित केले.

**जन्म**

१९७४: नवाजुद्दीन सिद्दीकी - भारतीय अभिनेते - राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

१९६४: मुरली - तामिळ अभिनेते (निधन: ८ सप्टेंबर २०१०)

१९३८ : गिरीश कर्नाड - अभिनेते व दिग्दर्शक ज्ञानपीठ पुरस्कार

१९३४ : रस्किन बॉंड भारतीय लेखक आणि कवी

१९२८ : कोलिन चॅपमन - लोटस कार कंपनीचे संस्थापक (निधन: १६ डिसेंबर १९८२)

१९२६ : स्वामी क्रियानंद - आध्यात्मिक गुरू आणि लेखक

१९२५ : पोल पॉट- कंबोडिया देशाचे २९वे पंतप्रधान (निधन : १५ एप्रिल १९९८)

१९१४: मॅक्स पेरुत्झ - ऑस्ट्रियन इंग्रजी जीवशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पारितोषिक (निधन: ६ फेब्रुवारी २००२)

**निधन**

२००९: रॉबर्ट एफ. फर्चगॉट - अमेरिकन बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक - नोबेल पारितोषिक (जन्म: ४ जून १९१६)

२००८: विजय तेंडुलकर - भारतीय नाटककार, लेखक, पत्रकार व साहित्यिक - पद्म भूषण, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (जन्म: ६ जानेवारी १९२८) २००४ : ई. के. नयनार - केरळचे ९वे मुख्यमंत्री (जन्म: ९ डिसेंबर १९१९)

१९९९: प्रा. रमेश तेंडुलकर- काव्य आणि संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक, कवी व समीक्ष

१९९७ : शंभू मित्रा - बंगाली रंगभूमीवरील अभिनेते, दिग्दर्शक व नाटककार (जन्म: २२ ऑगस्ट १९१५)

१९९५ : पं. विनयचंद्र मौदगल्य - ग्वाल्हेर घराण्याचे संगीतज्ञ

१९६९: आबा चांदोरकर - इतिहास व पुराणसंशोधक पांडुरंग मार्तंड

## महिनाभर डाळीचे सेवन न केल्यास आरोग्यावर कोणते परिणाम होऊ शकतात?



डाळ ही अत्यंत पौष्टिक असून, याचे आरोग्यास अनेक फायदे आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त डाळीचा आहारात समावेश करणे गरजेचे आहे. डाळीचे अनेक प्रकार आहेत; पण विशेष म्हणजे तूरडाळ शाकाहारी लोकांसाठी एक उत्तम पर्याय आहे; पण जर हीच डाळ एक महिन्यासाठी आहारातून काढून टाकली, तर काय होईल? द इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांच्या हवाल्याने याविषयी सविस्तर माहिती सांगितली आहे.

हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल्सचे वरिष्ठ सल्लागार फिजिशियन व मधुमेह तज्ज्ञ डॉ. के सोमनाथ गुप्ता सांगतात, "आपल्या चांगल्या निरोगी आरोग्यासाठी प्रोटीन्सची अत्यंत आवश्यकता असते; पण आहारात एक महिना डाळ नसेल, तर प्रोटीन्स मिळवण्यासाठी आपल्याला संघर्ष करावा लागू शकतो. विशेषत: शाकाहारी लोकांसाठी हे खूप मोठे आव्हान ठरू शकते."

एक महिना डाळ न खाल्ल्याने आपल्या शरीरावर कोणते परिणाम होऊ शकतात, हे समजून घेण्यासाठी डाळ आपल्या आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

डाळ खाण्याचे फायदे जाणून घ्या

प्रोटीनयुक्त वनस्पतींवर आधारित पदार्थ : स्नायू मजबूत ठेवण्यासाठी डाळ ही अत्यंत महत्त्वाची असून, शाकाहारी लोकांसाठी ती अत्यंत फायदेशीर आहे.

आतड्याच्या आरोग्यासाठी फायबर गरजेचे : डाळीमध्ये खूप जास्त प्रमाणात फायबर असते, जे पचनास मदत करते. त्याशिवाय यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास दूर होतो आणि आतड्यांचे आरोग्य सुदृढ राहते.

जीवनसत्त्वे आणि खनिजे : डाळींमध्ये लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम व जीवनसत्त्वे असतात; जी डाळीला अधिक पौष्टिक बनविण्यास मदत करतात.

रक्तातील साखरेचे नियंत्रण : डाळीमध्ये असलेले कॉम्प्लेक्स कर्बोदके पचायला वेळ घेतात. त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही.

हृदयाचे आरोग्य : नियमित डाळीचे सेवन केल्याने शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते; ज्यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

वजन नियंत्रण : डाळीमध्ये प्रोटन्स आणि फायबर भरपूर प्रमाणात राहतात; ज्यामुळे वजन कमी करण्यास आणि नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

हाडे मजबूत होतात : डाळीमध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस असतात; जे हाडे मजबूत ठेवण्यास मदत करतात.

महिनाभर डाळीचे सेवन न केल्यास आरोग्यावर कोणते विपरीत परिणाम होऊ शकतात? डॉ. गुप्ता यांनी याविषयी माहिती सांगितली आहे.

प्रोटीन्सची कमतरता : जे लोक शाकाहारी आहेत, त्यांना प्रोटीन्ससाठी डाळींवर सर्वांत जास्त अवलंबून राहावे लागते. डाळीच्या अभावामुळे स्नायू कमकुवत होणे किंवा त्यांना अशक्तपणा जाणवू शकतो.

## एमआय च्या शेवटच्या सामन्यानंतर कोच बाऊचर यांचा प्रश्न, पुढे काय? रोहित शर्मानं स्पष्ट सांगितलं

इंडियन प्रीमिअर लीग २०२४ मध्ये मुंबई इंडियन्सला १४ सामन्यांत फक्त ४ विजय मिळवून ८ गुणांसह स्पर्धेचा निरोप घ्यावा लागला. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली यंदा MI खेळले आणि फ्रँचायझीची कामगिरी अत्यंत निराशाजनक राहिली. काल वानखेडे स्टेडियमवर अखेरच्या साखळी सामन्यात त्यांना लखनौ सुपर जायंट्सकडून १८ धावांनी पराभव पत्करावा लागला आणि ते गुणतालिकेत शेवटच्या स्थानावर राहिले. आयपीएलच्या पुढील पर्वासाठी मेगा ऑक्शन होणार आहे आणि रोहित शर्मा दुसऱ्या फ्रँचायझीकडून खेळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशातच कालच्या शेवटच्या सामन्यानंतर MI कोच मार्क बाऊचर यांनी रोहितला थेट प्रश्न केला.. आता पुढे काय?

वानखेडेवरील कालचा हा सामना हा रोहितचा मुंबईच्या फ्रँचायझीकडून शेवटचाच असल्याची गाठ मनाशी पक्की करून चाहते स्टेडियमवर आले होते. रोहित जेव्हा बाद झाला, तेव्हा सर्वांनी जागेवर उभं राहून टाळ्यांचा कडकडाट केला. जणू रोहितचा हा निरोपाचा सामना आहे. भारताचा माजी सलामीवीर वसीम जाफर यानेही ट्विट केलं की, रोहितचा हा मुंबई इंडियन्सकडून शेवटचा सामना आहे, असा भास होतोय.. या सामन्यानंतर बाऊचर यांनी म्हटलं की, माझ्यासाठी, तो त्याच्या नशिबाचा मालक आहे. पुढच्या वर्षी मेगा ऑक्शन होणार आहे आणि कोण जाणे त्यात काय होईल?

रोहितने LSG विरुद्धच्या सामन्यात ३८ चेंडूंत १० चौकार व ३ षटकारांसह ६८ धावा केल्या. त्याच्या कामगिरीबद्दल बोलताना बाऊचर म्हणाले, रोहितसाठी हा हंगाम दोन भागांचा



राहिला... त्याने सुरुवात चांगली केली आणि चेंडू चांगले टोलावले. पण, दुसऱ्या टप्प्यात त्याला किंचीत अपयश आले. माझी काल रात्री रोहित शर्माशी चर्चा झाली. आम्ही यंदाच्या हंगामाचा आढावा घेतला. त्यानंतर, मी त्याला विचारले की पुढे काय आहे? आणि रोहित म्हणाला 'वर्ल्ड कप'.

रोहितने यंदाच्या पर्वात मुंबई इंडियन्ससाठी सर्वाधिक ४१७ धावा केल्या, त्यात १ शतक व १ अर्धशतकही आहे. त्यानंतर तिलक वर्मा ( ४१६), सूर्यकुमार यादव ( ३४५), इशान किशन ( ३२०) यांचा क्रम येतो.

नाणेफेक जिंकल्यानंतर MIने प्रथम गोलंदाजी स्वीकारली. लोकेश राहुल (५५ धावा) आणि निकोलस पूरन ( ७५ धावा) यांच्या फटकेबाजीने संघाला ६ बाद २१४ धावांपर्यंत पोहोचवले. लक्ष्याचा पाठलाग करताना रोहित शर्मा ( ६८ धावा) आणि डेवाल्ड ब्रेव्हिस ( २०) यांची ८८ धावांची भागीदारी तुटल्यानंतर मुंबईच्या फलंदाजांनी रांग लावली. नमन धीरच्या (२८ चेंडूत ६२* धावा, ४ चौकार आणि ५ षटकार) जबरदस्त खेळीमुळे मुंबईला आशा दाखवली होती. पण, त्यांची १८ धावेने हार झाली.

## राशि भविष्य

**मेष** — कोणत्याही प्रकारे तुमची ताकद कमी पडतेय असे नाही तर तुमची इच्छाशक्ती कमी पडतेय. तुमची ख-या क्षमता काय आहेत ते ओळखा. आज कुणी घेणेदार तुमच्या दरवाज्यावर येऊ शकतो आणि तुमच्याकडून उधार माघू शकतो. त्यांना पैसे परत करून तुम्ही आर्थिक तंगीमध्ये येऊ शकतात.

**वृषभ** — तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते. गुंतवणूक करणे बऱ्याच वेळा तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल आज तुम्हाला ही गोष्ट लक्षात येऊ शकते कारण जुन्या गुंतवणुकीतून आज तुम्हाला उत्तम नफा होऊ शकतो. विवाह बंधनात अडकण्यासाठी उत्तम काळ.

**मिथुन** — आज तुम्हाला तुमचे आरोग्य राखण्यासाठी आणि चांगेल दिसावे यासाठी प्रयत्न करायला खूप भरपूर मोकळा वेळ मिळेल. आई -वडिलांच्या आरोग्यावर तुम्हाला आज अधिक धन खर्च करावे लागू शकते. यामुळे तुमची आर्थिक स्थिती बिघडेल परंतु, नात्यामध्ये मजबुती येईल.

**कर्क** — आज तुम्ही एकदम शांततेत राहाल आणि मौजमजा करण्याचा तुमचा मूड बनेल. बँकेसंदर्भातील व्यवहार काळजीपूर्वक हाताळा. कौटुंबिक जबाबदा-या बंधनांकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. निष्काळजीपणा महागात पडू शकतो. प्रियजनांसोबत मेणबत्तीच्या प्रकाशात अन्नसेवनाचा आनंद लुटा.

**सिंह** — आज तुमचा विश्वास वाढेल आणि प्रगती साधता येईल. आजच्या दिवशी समोर येणारे गुंतवणुकींचे नवे पर्याय धुंडाळा, पण प्रकल्पाची व्यावहारिकता सखोलपणे अभ्यासल्यावरच आपला सहभाग जाहीर करा. तुमचा फुरसतीचा वेळ हा निस्वार्थी कामासाठी द्या.

**कन्या** — आरोग्यविषयक प्रश्नांमुळे कदाचित तुम्हाला अशांततेचा सामना करावा लागेल. तुम्ही जर अधिक धनप्राप्तीची अपेक्षा करत असाल तर सुरक्षित अशाच आर्थिक योजनांमध्ये पैसे गुंतवा. तुमच्या जवळच्या माणसांबरोबर कोणताही वादविवाद छेडू नका.

**तूळ** — दिवस भरत आलेल्या गर्भवती महिलांसाठी विशेष काळजीचा दिवस. कुणाचा सल्ला न घेता आज तुम्ही पैसा कुठे ही इन्व्हेस्ट करू नका. खाजगी आणि गोपनीय माहीत अजिबात उघड करू नका. प्रणयराधन करण्याच्या चाली फळणार नाहीत.

**वृश्चिक** — आज शांत राहा-तणावमुक्त राहाल. आज तुम्हाला अनेक नवीन आर्थिक योजना सादर केल्या जातील - कोणतेही वचन देण्याआधी सदर योजनेच्या चांगल्या-वाईट बाबी तपासून पाहा. आपल्या कामाबद्दल आणि आयुष्याबद्दलचा दृष्टीकोन स्पष्ट आणि चोख असू द्या. उत्तम मानवी मूल्ये जोपासा.

**धनु** — कोणतीही परिस्थिती ओढवली तरी अशी खंबीर भूमिका तुम्हाला ती परिस्थिती तुमच्या नियंत्रणात ठेवण्यासाठी सहाय्यकारी ठरेल. तुमच्या पैशामुळे आज अनेक समस्या निर्माण होतील - तुमचा खर्च खूप अधिक होईल किंवा तुमचे पाकिट हरवेल - निष्काळजीपणामुळे काही तोटा निश्चितपणे होईल.

**मकर** — तुमचे आई-वडिल तुमचा व्यर्थ खर्च पाहून आज चिंतीत होऊ शकतात आणि म्हणून तुम्हाला त्यांच्या रागाचे शिकार ही व्हावे लागू शकते. तुम्हाला आनंद देतील अशा गोष्टी करा, पण इतरांच्या कामापासून दूर रहा. प्रेमप्रकरण वेगळे वळण घेईल, अर्थात त्यात तुमचे भलेच होईल.

**कुंभ** — गर्भवती महिलांसाठी आजचा दिवसा फारसा चांगला नाही, चालताना अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. जे लोक आपल्या जवळच्या किंवा नातेवाईकांसोबत मिळून बिझनेस करत आहे त्यांना आज खूप विचार करून पाऊल ठेवण्याची आवश्यकता आहे अन्यथा आर्थिक नुकसान होऊ शकते.

**मीन** — मुले अतिशय शुद्ध मनाची असतात. त्यामुळे त्यांच्या निष्पाप, निस्सीम आनंदात असताना त्यांच्याभोवतीच्या लोकांमध्ये ते बदल घडवून आणू शकतात आणि नकारात्मक विचारांना तिथे थारा नसतो. प्रेमाचा सकारात्मक चेहरा दिसण्याची शक्यता. या राशीतील लोक खूप मनोरंजक असतात.

# 20 मे रोजीच्या ठाणे लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेचे नियोजन

● नवी मुंबई - लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 करिता 25 ठाणे लोकसभा मतदारसंघात 20 मे 2024 रोजी निवडणूक होत असून जास्तीत जास्त मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा याकरिता नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध प्रसार माध्यमांचा व साधनांचा वापर करून मोठ्या प्रमाणावर जनजागृती अभियान राबविण्यात आले आहे.

अशाच प्रकारे मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांवर नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याची खबरदारी घेत 150 ऐरोली विधानसभा मतदारसंघ कार्यालय तसेच 151 बेलापूर विधानसभा मतदारसंघ कार्यालय यांच्याशी समन्वय साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार या अनुषंगाने विशेष आढावा बैठक घेत अतिरिक्त आयुक्त श्री. शिरीष आरदवाड आणि श्री. सुनील पवार यांनी शहर अभियंता श्री. संजय देसाई, निवडणूक विभागाचे उपायुक्त श्री. शरद पवार, उपआयुक्त श्री. योगेश कडुसकर व श्री. चंद्रकांत तायडे यांच्यासह संबंधित विभागप्रमुख व विभाग अधिकारी यांच्याशी संवाद साधत मतदान केंद्रांवर पुरवावयाच्या सुविधांविषयी नियोजन केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका कार्यक्षेत्रातील मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदारांकरिता 360 व्हीलचेअर पुरवण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे सर्व ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व स्वच्छतागृहांची व्यवस्था पाहण्यात येत आहे.

मतदानाच्या दिवशी मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राची माहिती सहजपणे होण्यासाठी शहरातील चौकांमध्ये दिशादर्शक फलक लावण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे मतदान केंद्राच्या परिसरात मतदान केंद्राची नेमकी स्थळे दर्शविणारे क्यू आर कोड असलेले फलक प्रदर्शित केले जात आहेत.

याशिवाय मतदान जनजागृती अंतर्गत मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी बिल्ले तयार करण्यात आले असून ते महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच स्वच्छताकर्मी आपल्या छातीवर प्रदर्शित करून मतदान करण्याचे आवाहन करणार आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आशा वर्कसमार्फतही मतदानाच्या दिवशी घराघरातील मतदारांना मतदान करण्यासाठी आवाहन केले जाणार आहे.

त्यासोबतच नवी मुंबई महानगरपालिकेची आरोग्य पथके व रुग्णवाहिकाही सुसज्ज असणार आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेने सुरूवातीपासूनच स्वीप उपक्रमांतर्गत मतदार जनजागृतीसाठी वेगवेगळे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले असून त्यामध्ये चौकाचौकांमध्ये पथनाट्य सादरीकरण, मॉल्समध्ये फ्लॅश मॉबसारखा आकर्षित करून घेणारा उपक्रम, चित्रपटगृहांमध्ये व्हिडिओ क्लिपद्वारे मतदान जनजागृती, महानगरपालिकेच्या सर्व सोशल मीडिया माध्यमांद्वारे प्रशांत दामले, भरत जाधव, कविता लाड अशा नामवंत कलावंतांच्या चित्रफिती प्रदर्शित करून तसेच ग्राफिक प्रदर्शित करून मतदान करण्याचे केलेले आवाहन, चौकाचौकांमध्ये फ्लेक्स होर्डिंगद्वारे तसेच डिजिटल होर्डिंगद्वारे केलेली जनजागृती, नवी मुंबई महानगरपालिकेच्या 400 हून अधिक एनएमएमटी बसेस व बसस्टॉपवर बॅनरव्दारे केलेली प्रसिद्धी तसेच एनएमएमटी चालक व वाहक यांनी मतदानाचा संदेश प्रसार करणारी गांधी टोपी घालून केलेली मतदार जागृती, नवी मुंबई महानगरपालिकेच्या कचरा वाहतूक करणाऱ्या 200 हून अधिक वाहनांवर मतदार जनजागृतीचे जिंगल प्रसारण, मालमत्ता देयकांवरुन तसेच रुग्णालयातील केसपेपरवरून मतदान करण्याचे केलेले आवाहन, ठिकठिकाणी लावलेले सेल्फी पॉईंट - अशा कल्पक संकल्पना राबवत व्यापक जनजागृती करण्यात आली.

शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या रॅली काढून तसेच शाळा शाळांमध्ये निबंध, चित्रकला, रांगोळी, गायन, वक्तृत्व असे नानाविध उपक्रम राबवून मतदान जनजागृती करण्यात आली. त्याचप्रमाणे 1 लाख 3 हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी आपल्या आई-बाबांना पत्र लिहून मतदानाचे आवाहन केले. अशा सर्वच अभिनव उपक्रमांची दखल नागरिकांप्रमाणेच निवडणूक आयोगाकडूनही घेतली गेली.

लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महानगरपालिका निवडणुकीच्या दिवसापर्यंत अधिक प्रभावीपणे प्रचार मोहीम राबवणार असून त्याविषयी या बैठकीमध्ये सखोल चर्चा करण्यात आली व नियोजन करण्यात आले.






## लहानपणी कचऱ्यात सापडलेल्या मुलीची गगनभरारी; अनाथ-अंध मालाचे एमपीएससीत यश



● अमरावती : जन्मत:च अंध असलेल्या त्या चिमुकलीला तिच्या जन्मदात्यांनी जळगाव येथील रेल्वेस्थानकाच्या कचरा पेटीत टाकले. पोलिसांचे लक्ष गेल्यानंतर त्यांनी तिला ज्येष्ठ समाजसेवक शंकरबाबा पापळकर यांच्या वझ्झर येथील आश्रमात आणले. आणि तिच्या आयुष्याला आधार मिळून जगण्याला नवी उभारी मिळाली. विषम परिस्थितीला तोंड देत जिद्दीने अभ्यास करीत तिने एमपीएससी परीक्षेत यश मिळवले. माला हिने ही गगनभरारी घेतली आहे.

शंकरबाबा पापळकर यांच्या सहकार्याने तिने हे यश प्राप्त केले आहे. दिव्यांगांच्या पुनर्वसनाच्या इतिहासात नवीन अध्याय या निमित्ताने जोडला गेला आहे. संधी आणि साधनांचा अभाव असल्याचे कारण देत अनेकजण आपल्या नशिबाला दोष देत असतात. अशांसाठी माला या २५ वर्षीय मुलीची कथा प्रेरणादायी आहे. माला ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) लिपिक 'गट क' मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे.

जन्मत: अंध असल्याने आई-वडिलांनी मालाला जळगाव रेल्वे स्थानकावर कचरा पेटीत टाकून दिले होते. पोलिसांनी आई-वडिलांचा, नातेवाईकांचा शोध घेतला. परंतु शोध न लागल्याने तिला जळगाव येथील रिमांडहोम मध्ये दाखल करण्यात आले. तेथे दिव्यांगाच्या पुनर्वसनाची कुठलीही व्यवस्था नसल्याने बालकल्याण समितीच्या आदेशान्वये पोलीसांनी तिला वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य दिव्यांग बेवारस बालगृहाचे संचालक शंकरबाबा पापळकर यांच्या ताब्यात दिले. शंकरबाबांनी तिच्या पुनर्वसनाची जबाबदारी स्वीकारुन माला हिला वडील म्हणून स्वत:चे नाव दिले. त्या आधारे तिचे आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, रहिवासी दाखला, इत्यादी कागदपत्राची पुर्तता करुन तिच्या शिक्षणाची व्यवस्था केली. अनाथ, बेवारस, दिव्यांग १२५ मुला-मुलींसोबत बालगृहात मालाचा जीवनप्रवास सुरू झाला. जिद्द आणि परिश्रमाच्या बळावर मालाने शिक्षणही सुरू ठेवले. येथील विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्थेतून (व्हीएमव्ही) तिने कला शाखेची पदवी परीक्षा २०१८ मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली.

## 1 जून ते 31 जुलैपर्यंत मासेमारीस मनाई, नौकांना समुद्रात जाण्यास बंदी

● रत्नागिरी : राज्यात अवकाळी पावसाने थैमान घातल्याचं चित्र गेल्या आठवड्यात पाहायला मिळालं. राजधानी मुंबईतही (Mumbai) सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. त्यावेळी, घाटकोपमध्ये महाकाय बॅनर कोसळून दुर्घटनाही घडली. तर, अद्यापही पुढील 2 दिवसांसाठी अनेक जिल्ह्यात पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. आता, मान्सूनपूर्व (Monsoon) पाऊसानंतर यंदा लवकरच मान्सूनची हजेरी लागणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे, पावसाळयाच्या दृष्टीने तयारी करण्यात येत आहे. मच्छिमारांसाठी व नौका पर्यटकांसाठी काही महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, 1 ते 31 जुलै या कालावधीत 2 महिन्यांसाठी मासेमारी (Fishing) करण्यास मनाई करण्यात आली आहे.

मच्छिमारी सहकारी संस्था, त्यांचे नौकामालक, सभासद व अन्य संबंधितांना महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम 1981 व सुधारणा अध्यादेश, 2021 अन्वये यावर्षी 01 जून ते 31 जुलै 2024 (दोन्ही दिवस धरुन 61 दिवस) या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधी क्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास मनाई करण्यात आली आहे. अशी माहिती मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्त अभयसिंह शिंदे इनामदार यांनी दिली आहे.

या बंदी कालावधीत सागरी कायद्याचा भंग करुन मासेमारी करणारे मच्छिमार खालील कारवाईस पात्र होतील.



1) पावसाळी मासेमारी बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहील.

2) पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बिगर- यंत्रचालित नौकांना लागू राहणार नाही.

3) समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका दि. 01 जून 2024 पूर्वी मासेमारी बंदरात परतणे बंधनकारक आहे. तसेच दि. 31 जुलै 2024 वा त्यापुर्वी सदर नौकांना समुद्रात मासेमारीकरीता जाता येणार नाही.

4) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर (सागरी किनाऱ्यापासून 12 सागरी मैलापुढे) खोल समुद्रात मासेमारीस जाणाऱ्या नौकांस केंद्र शासनाच्या खोल समुद्रातील मासेमारीबाबतचे धोरण / मार्गदर्शक सुचना/ आदेश लागु राहतील.

5) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासुन 12 सागरी मैलापर्यंत) यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौका पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना आढळल्यास / केल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), 2021 च्या कलम 14 अन्वये नौका व नौकेवर बसविलेली उपसाधने व मासेमारी सामुग्री आणि त्यामध्ये सापडलेली मासळी जप्त करण्यात येईल तसेच कलम 17 मधील तरतुदी अन्वये जास्तीत जास्त कठोर शास्ती लादण्यात येईल.

6) पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेस अपघात झाल्यास अशा नौकेस शासनाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही.

7) बंदी कालावधीमध्ये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात मासेमारी नौकास अवागमन निषिध्द आहे.

## कोकणात रानगव्याचा धुडगूस, आंबा बागांचं नुकसान

● सिंधुदुर्ग : अभिनेता अतुल कुलकर्णी यांची मुख्य भूमिका असलेला वळू चित्रपटाच्या माध्यमातून गावातील वळूमुळे ग्रामस्थांना होत असलेला त्रास आणि तो वळू पकडण्यापर्यंतची सर्व उठाठेव 70 मिमि पडद्यावर झळकली आहे. ग्रामीण भागात आजही वळू म्हणजेच देवाच्या नावाने सोडलेला बैल गावकऱ्यांसाठी कधी कधी त्रासदायक ठरतो. मात्र, जंगली रेडा म्हणजेच रानगव्याच्या त्रासामुळे गावकरी त्रस्त झाले असून वन विभागाकडे त्यांनी धाव घेतल्यां दिसून येत आहे. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड तालुक्यातील फणसगाव, दारुम भागात गवारेड्यांचा मुक्त संचार मागील काही दिवसांपासून सुरू असून गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरगाव, कुवळे,चाफेड नंतर आता फणसगाव, दारुममध्ये देखील गवारेड्यांचा मुक्त संचार होऊ लागल्यामुळे सध्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. फणसगाव येथे दोन गवे गावात जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर वावरताना मोबाईलमध्ये कैद झाले आहेत. येथील वन परिसरातील



रानगवा मानवी वस्तीत येऊन ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत करताना दिसून येत आहे. गावातील शेतकऱ्यांच्या शेतात धुडगूस घालून कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या बागांचं नुकसान होत आहे. सध्या आंब्याचा हंगाम असल्याने गव्यांच्या भीतीने गावातील लोक आपल्या आंबा बागेत जायलाही घाबरत आहेत. वनविभागाने तात्काळ या गव्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांतून केली जात आहे.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी पुणे शहरातही रानगव्याचा वावर दिसून आला होता. त्यामुळे, पुणेकरांनीही रानगवा पाहण्यासाठी गर्दी केली होती. मात्र, मानवी वस्तीत रानगवा आल्यानंतर पुणेकरांचीही धांदल उडाली होती. अखेर, वन विभागाने मोठ्या कसरतीने येथील रानगव्याला पकडून जंगलात सोडून दिले होते. आता, सिंधुदुर्गमधील ग्रामस्थांनीही वन विभागाकडे रानगव्यांना पकडून नेण्याची मागणी केली आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोन दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पाऊसासह चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे कणकवली तालुक्यात 140 घरांचे नुकसान झाले आहे. त्यामध्ये 10 सार्वजनिक इमारती तर सर्वाधिक घरांचे नुकसान हरकुळ बुद्रुक आणि हळवल गावांमध्ये झाले आहे.

## Man makes hoax threat alert ahead of PM Modi's rally in Shivaji Park, arrested



● Dehradun - Chairing a review meeting regarding the Chardham Yatra arrangements at the secretariat, Uttarakhand Chief Minister Pushkar Singh Dhami Friday received feedback from the District Magistrates and later visited the Yamunotri region to take stock of the travel arrangements.After meeting people, Dhami said that given the large number of pilgrims, it has been decided not to allow travel without registration. With nearly twice the number of pilgrims embarking on the Char Dham yatra since it commenced on May 10, the state government has reported the death of 11 pilgrims in the first five days.

The government is always ready to welcome all the devotees, said Dhami, adding that considering the dignity and geographical peculiarities of the Dhams, it has become necessary to regularise the yatra. The CM also conducted an aerial inspection of Kharsali and Janki Chatti areas including Yamunotri Dham. During the review meeting, Dhami instructed the secretaries of all departments related to the Chardham Yatra to continuously monitor all arrangements on the Chardham Yatra routes.

## Fraudster posing as CBI officer dupes Mumbai youth of nearly Rs 10 lakh

● Mumbai - If you get a phone call with an automated recorded message in which it is being claimed that a summon or an arrest warrant has been issued against you by the high court or the CBI or any other law enforcement agency, then do not trust the caller, it's a fraud.

The Borivli police on Friday registered a cyber fraud case wherein a youth was duped of nearly Rs 10 lakh by the fraudsters posing as CBI officers. The accused persons threatened the victim with police action and tricked him into transferring money by claiming that his bank accounts are involved in a money laundering case. The police suspected a professional cyber fraud gang behind the fraud.

The 26-year-old complainant is a Borivali (West) resident. On May 15, he received a call from an unknown number. A recorded message was played over the call.

According to the police complaint, the audio message stated that a summons had been issued against him by the Delhi High Court and asked him to press '0' for more details. When the complaint pressed '0', the call got connected to one Sanjay Sharma who asked the complainant to



furnish his full name and mobile number. Sharma also told the complainant that a bank account has been opened in the Lajpat Nagar branch of ICICI Bank and illegal transactions worth Rs 25 lakh have been carried out from this bank account, the complainant stated in the FIR.

Sharma also told the complainant that a case has been registered against him and further enquiry will be carried out by the CBI's chief officer of Cyber branch. He then handed over the call to another person who obtained details like his name, Aadhar card and bank accounts details etc.

The second person told the complainant that using his name and details 25 fake accounts have been opened. Hence, the money in the complainant's ICICI bank account has to be verified legally, the FIR stated. The person told the complainant to transfer all his money (Rs 15 lakh) from his bank account to another bank account of the CBI for verification purposes. After the verification, the money will be refunded, the complainant was told, the FIR stated.

Following instructions, the complainant in three transactions transferred Rs 9.5 lakh in the given bank account number.

However, he smelt a rat and suspected that the person could be a fraud. Hence, he started looking for information about this kind of cyber fraud over the internet. The complainant came across news articles regarding such frauds and realised that he was cheated.

He then contacted cyber fraud national helpline 1930 and followed their instructions. He also filed a police complaint.

Borivli police have registered a case of cyber fraud and are trying to get details of the beneficiary bank account holders, said an officer. Mumbai cyber police have appealed to the citizens not to trust any caller even if they are saying that they are calling from the CBI, the ED, cyber cell or police department or High Court asking to transfer money in any particular account for the purpose of investigation or inquiry.

## Kejriwal's aide Bibhav Kumar detained by Delhi police in Swati Maliwal assault case



● Delhi News Live Updates: The Delhi police on Saturday detained Chief Minister Arvind Kejriwal's aide Bibhav Kumar in the Swati Maliwal assault case. Kumar's lawyers have moved an anticipatory bail in the Tis Hazari court, which will be heard by Additional Sessions Judge Sushil Anuj Tyagi today. The FIR lodged by Maliwal states that she was allegedly slapped by Kumar seven-eight times, "kicked on the chest, stomach and pelvis area", and threatened that she would be killed. Meanwhile, AAP on Saturday released a second CCTV footage of the Rajya Sabha MP leaving Kejriwal's residence on the day of the incident. Referring to the video, Delhi Minister and AAP leader Atishi claimed that Maliwal is lying. Atishi said, "In this video, neither her clothes are torn, or she is unable to walk or her head is injured … She is clearly lying. Earlier in the day, Atishi said that Maliwal was in contact with BJP leaders. Urging for an impartial probe in the case, Atishi said, "BJP used her as a pawn during the elections. She was in touch with BJP leaders. If Delhi Police conducts an impartial investigation in this case, everything will become clear." AAP has released CCTV footage showing Maliwal getting out of CM's residence on the day of the alleged assault.

# त्रिनिदाद आणि टोबॅगो प्रजासत्ताकचे प्रधानमंत्री डॉ. रॉली यांचे मुंबईहून प्रयाण



● मुंबई, प्रतिनिधी :

त्रिनिदाद आणि टोबॅगो प्रजासत्ताकचे प्रधानमंत्री डॉ. किथ रॉली यांचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून दु .१.०५ वाजता प्रयाण झाले.

त्यांना निरोप देण्यासाठी मुख्य सचिव नितीन करीर, अप्पर मुख्य सचिव आणि मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, विदेश मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव जी. व्ही. श्रीनिवास, अतिरिक्त पोलिस महासंचालक कैसर खालिद, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त विश्वास मोटे यांच्यासह राजशिष्टाचार व पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# ‘अपना ये वोट है..अपनी ये पहचान है..’

## केंद्रीय निवडणूक निरीक्षक चित्तरंजन माझी यांचे नागरिकांना गाण्यातून आवाहन

● ठाणे, प्रतिनिधी :

सोमवार, दि. 20 मे रोजी 2024 रोजी ठाणे जिल्ह्यात मतदान होत आहे. मतदानाचा दिवस हा मौजमजेसाठी सुट्टी म्हणून साजरा न करता त्या दिवशी मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पडून लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक चित्तरंजन धंगडा माझी यांनी ‘अपना ये वोट है..अपनी ये पहचान है..’ या गाण्याच्या माध्यमातून नागरिकांना केले आहे.

23 भिवंडी लोकसभा मतदारसंघात केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक चित्तरंजन धंगडा माझी हे दाखल झाले आहेत. दि.20 मे हा दिवस लोकशाहीच्या उत्सवाचा आहे, त्यामुळे मतदानाच्या दिवशी नागरिकांनी शहर सोडून बाहेर जावू नये.. हा आशय असलेले हिंदी गाणे त्यांनी लिहून गायले आहे. संगीतकार चिनार-महेश यांनी या गाण्याला संगीत दिले असून संपूर्ण गाणे हे ठाण्यातच तयार झाले आहे.



ठाणे लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने हे गाणे केल्यामुळे हे गाणे त्यांनी ठाणे जिल्हा प्रशासन आणि ठाणेकर मतदारांना अर्पण केले असल्याचे आज या गाण्याच्या सादरीकरणावेळी श्री.चित्तरंजन माझी यांनी नमूद केले.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी श्री.अशोक शिनगारे यांच्या हस्ते केंद्रीय निवडणूक निरीक्षक चित्तरंजन धंगडा यांच्या गाण्याचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) श्री.मनोज जैन, निवडणूक खर्च निरीक्षक यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती छायादेवी शिसोदे,अप्पर जिल्हाधिकारी तथा आचार संहिता कक्ष नोडल अधिकारी विजयसिंह देशमुख, नियोजन विभागाचे सहसंचालक अमोल खंडारे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) अर्चना कदम, ठाणे महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त मंगेश चितळे, भिवंडी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, मीरा भाईंदर महानगरपालिका उपायुक्त रवी पवार, उपजिल्हाधिकारी शरद पवार, ठाणे महानगरपालिका उपायुक्त उमेश बिरारी, कामगार उपायुक्त श्री.पवार, जिल्हा अग्रणी बँक जिल्हा व्यवस्थापक श्री. मंचाल, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संजय बागूल, sveep तहसिलदार स्मिता मोहिते, तहसिलदार श्रीमती भगत, प्रदीप कुडळ, जिल्हा प्रशासनातील इतर अधिकारी, उद्योग, सामाजिक, शिक्षण, विविध हौसिंग सोसायटीचे अध्यक्ष, पदाधिकारी, प्रसारमाध्यम क्षेत्रातील मान्यवर, तृतीय पंथीय प्रतिनिधी उपस्थित होते. केंद्रीय निवडणूक निरीक्षक चित्तरंजन धंगडा माझी हे सन 2010 च्या बँचचे आयआरएस अधिकारी आहेत. त्यांना शास्त्रीय संगीताची आवड असून गेल्या 6 वर्षापासून ते शास्त्रीय संगीत गात आहेत. त्यांनी गायलेले ‘वंदे भारत’ हे गाणे 26 फेब्रुवारी 2024 ला यूट्यूबवर प्रकाशित करण्यात आले आहे. मतदानाविषयी जनजागृती करणारे हे त्यांचे दुसरे गाणे आज ठाण्यात प्रकाशित करण्यात आले.

# वळीवामुळे भाज्या कडाडल्या, दरात २० रुपयांनी वाढ; नाशिक, पुणे जिल्ह्यांत उत्पादनात घट

● ठाणे, प्रतिनिधी :

गेले काही दिवस राज्यात ठिकठिकाणी होत असलेल्या वळीवाच्या पावसाचा परिणाम भाज्यांवर होऊ लागला आहे. भाज्यांच्या मोठे नुकसान झाल्यामुळे बाजारात आवक घटली आहे. परिणामी, घाऊक आणि किरकोळ बाजारात भाज्यांच्या दरात वाढ झाली. भेंडी, दुधी भोपळा, चवळी शेंग, फरसबी, कारले, वांगी आणि शिमला मिरचीचे दर किरकोळ बाजारात

| भाज्या | आठवड्याभरापूर्वी (घाऊक किरकोळ) | सध्या (घाऊक किरकोळ) |
|---|---|---|
| भेंडी | ३८ ६० | ४५ ८० |
| दुधीभोपळा | २२ ६० | २५ ८० |
| चवळी शेंग | ३० ६० | ४० ८० |
| फरसबी | ९० १००-१२० | १०० १८०-२०० |
| कारले ४२ ५० | ४५ | ६० |
| वांगी २४ ४० | ३४ | ६० |
| शिमला मिरची | ३५ ६० | ४५ ८० |

गेल्या आठवड्याच्या तुलनेत दहा ते वीस रुपयांनी वाढले आहेत. यंदा वळीव पावसाचा भाजी उत्पादनाला फटका बसला. वाशी कृषी उत्पन्न



बाजार समितीत पुणे आणि नाशिक जिल्ह्यात पिकवलेल्या भाज्यांची मोठी आवक होते. राज्यातील विविध भागांत झालेल्या वळीव पावसामुळे भाज्यांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे आवक घटली आहे.

वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत आठड्याभरापूर्वी दिवसाला १२० ते १५० गाड्या दाखल होत होत्या. गुरुवारपासून त्यात घट झाली. सध्या दिवसाला ९० ते ११० भाजीच्या गाड्या दाखल होत असल्याचे वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीतील सूत्रांनी सांगितले. परिणामी, मुंबई तसेच उपनगरातील बाजारपेठेत भाज्यांची आवक घटली असून त्यांच्या दरात वाढ झाली. किरकोळ बाजारात भेंडी, दुधी भोपळा, चवळी शेंग, कारले, वांगी , शिमला मिरची या भाज्या प्रति किलो ६० ते ८० रुपयाने विकल्या जात आहेत. तर, फरसबीने किरकोळ बाजारात शंभरी पार केल्याचे ‘एपीएमसी’तील भाजी बाजाराचे उपसचिव मारुती पबितवार यांनी सांगितले.

# वादळी वारा पाऊस गाराच्या तडाख्याने पार्डी खुर्द येथील केंद्रे यांच्या शेतातील सोलार पंप उद्ध्वस्त



● किनवट , प्रतिनिधी :

मौजे पार्डी खुर्द येथील शेतकरी संतोष गोविंदराव केंद्रे यांच्या शेत सर्वे नंबर एक मधील मालकी शेतीतील सोलार पंप दिनांक 12, 5, 2024 रोजी अचानक आलेल्या वादळी वारा, पाऊस आणि गारा या आसमानी संकटाने शेती उपयोगासाठी बसविलेले सोलार पंप पूर्णतः कोसळून पडले. परिणामी त्यांचे पूर्णतः नुकसान झाले. त्यामुळे सदर शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, किनवट तालुक्याच्या परिसरात दिनांक 12,5, 2024 रोजी अचानक वारा, पाऊस आणि गारांचा मारा सुरू झाला. परिणामी परिसरातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यात अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले. झाडे तर कुठे ताराही तुटल्या. फळबागांचेही नुकसान अनेक ठिकाणी झाले.परिणामी बळीराजाच्या नशिबी नुकसानीची मालिका सुरूच असते त्यात पूर्णतः शेतकरी भरडरून जातो. असाच प्रकार दिनांक 12 मे च्या आलेल्या अस्मानी संकटाने परिसरातील शेतकर्यांना पछाडून टाकले. त्यात पार्डी खुर्द येथील प्रामाणिक आणि कष्टवान शेतकरी संतोष केंद्रे यांचे शेतीतील पिकांसाठी आधार होईल या उदात्त हेतूने बसविलेले सोलार पंप या झालेल्या अस्मानी संकटात कोसळून पडल्यामुळे निकामी झाले. त्यामुळे ते अडचणीत सापडले आणि त्यांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून त्यांना शासनाने मदत मिळवून द्यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

# आजच आपले नाव शोधा.. आणि मतदानाचा पवित्र हक्क बजावा...! -जिल्हाधिकारी अशोक शिनगारे



● ठाणे, प्रतिनिधी :

येत्या सोमवारी 20 मे 2024 रोजी मतदान होत आहे. मतदानाला जाण्यापूर्वी प्रत्येक मतदाराने आपले नाव कोणत्या केंद्रावर आहे, मतदान केंद्र कोठे आहे, याची माहिती आजच जाणून घ्या. यासाठी टोल फ्री क्रमांक 1950 किंवा मा. भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या voter helpline app तसेच www.eci.gov.in या वेबसाईटवर आपले नाव आपण पाहू शकाल व मतदान केंद्रावर जाणे सोईचे होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. अशोक शिनगारे यांनी सर्व नागरिकांना केले आहे.

निवडणुकीमध्ये मतदारांचा टक्का वाढावा, यासाठी निवडणूक विभागाच्या माध्यमातून गेल्या तीन महिन्यांपासून स्वीपच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले गेले असून नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. स्वीपच्या माध्यमातून केलेल्या जनजागृतीला नागरिकांचा सहभाग देखील मिळाला असून मी मतदान करणार... आपणही मतदान करा...! असा जनजागृतीचा संदेशही स्वीपच्या पथकांमार्फत देण्यात आला आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. अशोक शिनगारे यांनी सोमवार, दि.20 मे 2024 रोजी सकाळी 7.00 ते सायं. 6.00 वाजेपर्यंत मतदानाची वेळ असून नागरिकांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावावे, असे आवाहन केले आहे.

# भिवंडी लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चा बाबत केंद्रीय निवडणूक निरीक्षक (खर्च) यांच्या उपस्थितीत तिसरी खर्च तपासणी




● भिवंडी, प्रतिनिधी :

२३ भिवंडी लोकसभा मतदारसंघासाठी यापूर्वी जाहीर केलेल्या वेळा पत्रकानुसार उमेदवारांचा निवडणूक खर्चाबाबतची तिसरी तपासणी मा. केंद्रीय निवडणूक निरीक्षक (खर्च) चित्तरंजन धंगडा माझी याच्या उपस्थितीत महापालिका मुख्यालयात दिनांक १८/०५/२०२४ रोजी पार पडली.

सदर तपासणीच्या वेळी एकूण २७ उमेदवारांपैकी २६ उमेदवारांनी आपला निवडणूक खर्चा संबंधीचे लेखे माननीय केंद्रीय निवडणूक निरीक्षक (खर्च) यांच्याकडे सादर केले असून १ उमेदवार गैरहजर होता. २ उमेदवारांचे खर्चामध्ये तफ़ावत असल्याने मा. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे त्यांना नोटीस बजावण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. खर्च सादर केलेल्या उमेदवारांचा खर्च विषयक तपशील मा. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या संकेत स्थळावर तसेच २३ भिवंडी लोकसभा निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय येथील नोटीस बोर्डवर उपलब्ध आहेत.

# भिवंडीत ज्येष्ठ नागरिक संघाकडून मतदान जनजागृती

● भिवंडी, प्रतिनिधी :

भिवंडी लोकसभा निवडणूक मतदारसंघांतील स्वीप कक्षामार्फत ठिकठिकाणी मतदान जनजागृती कामी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. १३६ भिवंडी पश्चिम विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिक संघ, आदर्श पार्क रोड, कोंबडपाडा भिवंडी यांच्या वतीने राजैय्या गाजेंगी सभागृह ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावर मतदान जनजागृती प्रभातफेरी काढण्यात आली. या प्रभातफेरीत भिवंडी ज्येष्ठ नागरिक संघाचे महिला व पुरुष असे २२० सदस्य तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक संघाने यावेळी मतदार जनजागृतीसाठी फलक, सेल्फी पाईट आणि लाऊड स्पीकरच्या सहाय्याने मतदारांना मतदानाचे महत्त्व सांगितले व मोठ्या संख्येने मतदानासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले. ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव श्री. सदानंद पिंपळे यांनी उपस्थित मतदार स्त्री पुरुषांना मतदान करणे का आवश्यक आहे हे विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. याप्रसंगी भिवंडी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. जयंत सोनटक्के उपाध्यक्ष श्री. चंद्रकांत पाटील, संघटनेच्या महिला प्रतिनिधी श्रीम निलम कालगावकर सचिव श्री सदानंद पिंपळे तसेच स्वीप पथकाचे प्रमुख श्री. शरद जाधव, सदस्य श्री. राजेंद्र सातपुते, श्री. सूरेंद्र पाटील, श्री. संजय तुपांगे आणि राहुल परदेशी उपस्थित होते.




१३७ भिवंडी पूर्व विधानसभा मतदार स्वीप पथक व प्रजापती ब्राह्मकुमारी संस्थाच्या मदतीने फेणे व ताडाली येथे मतदान जन जागृती कार्यक्रम घेऊन मतदारांना दि 20/5/2024 रोजी मतदान करणे करिता आवाहन करण्यात आले. तसेच आशा स्वयंसेविका मार्फत घरोघरी भेटी देऊन मतदान जनजागृती करून २० मे रोजी मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. त्याचबरोबर स्वीप जनजागृती पथक द्वारा खंडू पाडा भाजी मार्केट येथे मॅस्कॉट द्वारे मतदान जनजागृती करण्यात आली.

१३५ शहापूर विधानसभा मतदारसंघ स्वीप कक्षांतर्गत खरम्याचा पाडा, टेकरेपाडा कळमगाव ता. शहापूर कातकरी पाड्याला भेटुन मतदार जागृती सर्वांनी मतदान करावे असे मार्गदर्शन केले श्री राजेंद्रकुमार हिवाळे, प्रकल्प अधिकारी व नोडल अधिकारी यांनी मतदार जागृती केली. त्यांचेसोबत श्री अरविंद जाधव, सहायक प्रकल्प अधिकारी, श्री. रविंद्र घोलप, शिक्षण विस्तार अधिकारी, श्री विजय मेढे, उप लेखाधिकारी, श्री मधुकर दिघे, वरिष्ठ लिपीक, पोलीस पाटील व गावकरी उपस्थित होते,

१३८ मुरबाड विधानसभा मतदार संघ स्वीप कक्षामार्फत कुळगाव बदलापूर नगर परिषद क्षेत्र सोनिवली कातकरी वाडी येथे, मतदानाची टक्केवारी वाढणे करिता बदलापूर पश्चिम येथे मेगा फोन द्वारे जनजागृती करण्यात आली व कुळगाव बदलापूर नगर परिषद कात्रप परिसर कमी मतदान केंद्र ठिकाणी तसेच शिरगाव परिसर येते रिक्षा वर ध्वानीक्षेपक लाऊन जनजागृती करण्यात आली. तसेच मुरबाड तालुक्यातील पेट्रोल पंपावर हस्तपत्रिका वाटप करुन तसेच पोस्टर द्वारे मतदान जनजागृती करण्यात आली. त्याचबरोबर 139 मुरबाड विधानसभा मतदारसंघात जीवनदीप विद्यालय गोवेली येथे नवमतदारांना मार्गदर्शन करून तसेच पथनाट्य द्वारे मतदान जनजागृती करण्यात आली.